
MAHMARI 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे



# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष चौदावे / अंक ७ / जुलै २०१३

## संपादकीय

## आपत्ती व्यवस्थापनातील अव्यवस्था

ढगफुटी, पावसाचे थैमान आणि न भूतो न भविष्यती असे पूर यांना पूर्वी 'आस्मानी संकटाच्या' घटना म्हणता आल्या असत्या. पण उत्तराखंडामधील या घटना दुर्दैवाने मानवी, म्हणजेच सुल्तानी कारणांमुळे घडलेल्या घटना आहेत. सृष्टीचं चक्र उलटं फिरवत निसर्गाशी खेळ करू पाहणाऱ्या माणसाच्या कर्माची ही कहाणी आहे. सुधारणेचा घोष करून हिमालयावर हल्लाबोल करणाऱ्या माणसांनी जलविद्युत प्रकल्पासारख्या योजना राबवता याव्यात यासाठी कल्पनाही करता येणार नाही इतकी जंगलतोड केली. निसर्गाचे वरदान असणाऱ्या या देवभूमीत तंबाखूच्या गुटख्याची पाकिटं आणि प्लास्टिकचा इतका पसारा केला, की त्याची मोजदाद देवभूमीतील 'देवच' करू जाणे. याचाच अर्थ हे संकट आस्मानी नव्हतं तर मानवनिर्मित होतं.

आधीच संकटांची चंगळ असलेल्या या देशात आणखी एक संकट आलं, शंकरानं जणू काही तिसरा डोळा उघडला आणि हजारोंच्या संख्येने गेलेले यात्रेकरू सर्वार्थाने दिशाहीन झाले. कित्येकांना या देवभूमीतच 'राम' म्हणावा लागला. मग माध्यमांची स्पर्धा सुरू झाली. दूरदर्शनची 'सीएनएन' पासून ते 'जय महाराष्ट्रपर्यंतची' प्रत्येक वृत्त वाहिनी सुखरूप असलेल्या, परत आलेल्या, मरण पावलेल्या, बेपत्ता असलेल्या यात्रेकरूंच्या मिळतील तशा संख्या प्रेक्षपित करायला लागल्या. हा आकड्यांचा गोंधळ अजूनही चालू आहे. एका वृत्तपत्राच्या संपादकीयात म्हटलं आहे की जगातील सर्वांत मोठी बचाव मोहीम ठरलेल्या या प्रयत्नांमध्ये आतापर्यंत (दि. २१ जूनपर्यंत) एक लाखाच्या घरात लोकांना वाचवण्यात यश आले आहे.

ऐन पावसाळ्यात असलेल्या या यात्रेची जी दृश्ये वारंवार प्रक्षेपित केली जात होती, त्यात पत्त्याच्या बंगल्यासारखी कोसळलेली इमारत हे एक दृश्य होते. गेल्या काही वर्षांत अशा इमारतींतील हॉटेल्स, धर्मशाळा यांनी या यात्रास्थानांचे 'पिकनिक स्पॉटस्' केले व अनेक यात्रा कंपन्यांना पैसे कमावण्याचे नवे कुरण मिळाले. जे या ठिकाणचे, तेच देशभरातले. त्यामुळे ही आपत्ती कोणत्याही अर्थाने नैसर्गिक ठरत नाही.

या सर्व पार्श्वभूमीवर लष्कराच्या जवानांनी जी शर्थ केली, लोकांचे प्राण वाचवण्यासाठी जे अपार परिश्रम घेतले,

(पृष्ठ क्र २ वर)

(मुखपृष्ठावरून – **संपादकीय)**

त्याला तोड नाही. खराब हवामान, सतत कोसळणारा पाऊस, रोंरावत वाहणारे पाणी, नकारात्मक वृत्तीचा करावा लागणारा सामना, नदीवर बांधावे लागलेले दोरखंडांचे सेतु हे काम किती कठीण आहे, हे ते जवानच जाणोत. सरकारने(?) नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे काही कोटींची (कधीही न मिळणारी) मदत जाहीर केली. एका राज्याने आपला आकडा सांगितला की दुसऱ्यानेही सांगितला. ही स्पर्धा चालू होतीच; आणि दुसरीकडे त्याच दरम्यान कोणत्यातरी चषकासाठी झालेल्या सामन्यांत भारताच्या क्रिकेटचा संघ जिंकला. त्यांतील प्रत्येक खेळाडूला नेहमीप्रमाणे एक एक कोटी वाटले गेले. त्याचवेळी आपत्तीत जीवनदूत बनलेल्या व हजारोंचे प्राण वाचवता वाचवता हेलिकॉप्टरच्या अपघातात शहीद झालेल्या जवानांच्या नशिबी मात्र उपेक्षा! महाराष्ट्रातील जे तीन जवान शहीद झाले. त्यांच्या नातेवाईकांना भेटायला जाण्याची माणुसकी एकाही मोठ्या नेत्यांत नाहीच, पण तेथील (धुळे, जळगाव) परिसरातील स्थानिक राजकीय आमदार, खासदारातही नाही. एरवी पक्षाचा मोठा नेता आला की शेपूट हलवत हांजी हांजी करणारे हे सर्व लोकप्रतिनिधी कुठे होते? नंतर सारवासारव करून भेटीची केलेली नाटके काय उपयोगाची?

एकीकडे हे चित्र तर दुसरीकडे तथाकथित मोठ्या नेते मंडळींची 'हवाई पहाणी' चालू होती. काही नेते मी किती लोकांना वाचवले, तू किती लोकांना वाचवले अशा 'तू तू-मैं मैं' मध्ये मशगूल होऊन २०१४ ची तयारी करत होते. वा रे कार्यतत्परता!

उत्तराखंडामध्ये आपत्ती निवारणासाठी स्वतंत्र मंत्रालय आहे. या मंत्रालयाने या आपत्ती दरम्यान नेमके केले काय? पोलीस, नागरी सुरक्षा दल, स्वयंसेवी संस्था या कोणालाही आपत्ती निवारणाचे प्रशिक्षण दिलेले नाही. त्यामुळे सारी भिस्त मोठ्या प्रमाणात लष्करावर होती. हेलिकॉप्टरच्या ३३० उड्डाणांच्या मदतीने, जंगला-जंगलात फिरून हरवलेल्या देशबांधवांना शोधायचे काम या जवानांनी केले.

आपल्या आमदार, खासदार आणि क्रिकेटसारख्या निष्क्रीय खेळात नोटा छापणाऱ्या 'क्रिकेट वीरांनी' या जवानांसाठी आपण काय करतोय याचा अंतर्मुख होऊन विचार करायला हवा. मुख्यमंत्र्यांनी 'हेल्पलाईन' जाहीर केल्या की त्यांचे कार्य संपते का? हवाई पर्यटन करायचे, (खरे तर) सरकारी खर्चाने सहल करायची यासाठी हे लोक पदे भूषवतात. अडलेल्या भगिनीची 'सुटका' करणारे जवान, मोटारीच्या असंख्या फेऱ्या मारून सापडलेल्या माणसांना वाचवणारे जवान, शिस्तीचे आदर्श पाळणारे जवान... अशी आपले रक्षण करणारी माणसे पाहिली की असे वाटते, हे आहेत म्हणून देश आहे. नाहीतर देश एव्हाना विकला गेला असता!

**– मोहन पाठक**





वर्ष चौदावे/अंक ७/जुलै २०१३

वर्ष चौदावे/अंक ७ /जुलै २०१३

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १८ वे/अंक १ला)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email : perfectprints@gmail.com

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | श्री. मोहन पाठक | |
| २) | क्युफू येथील धार्मिक स्थळाला भेट | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | थंडीच्या लाटा हलव्यावर काटा | श्रीमती आशा भिडे | ७ |
| ४) | श्रीमत् भगवद् गीता - अध्याय सहावा<br>विषय : आत्म संयमन योग | कै. शं. बा. मठ | १० |
| ५) | साहित्य-जगत | श्री. शरद जोशी | १६ |
| ६) | प्रार्थना | श्री. नरेन्द्र नाडकर्णी | १९ |
| ७) | गुरूवर्य एस.व्ही. आणि माध्यमिक<br>शिक्षणोत्तर विद्यार्थी संघ | श्री. हेमचन्द्र स. मथुरे | २३ |
| ८) | जलसाक्षरता काळाजी गरज | अंकिता रविंद्र पाटील | २७ |
| ९) | भारतीय जनगणना-२०११ एक दृष्टीक्षेप | वैभव राजेंद्र वांदरकर | २९ |
| १०) | क्रांती हवी | धीरज पावडे | ३१ |
| ११) | परिसर वार्ता | संकलित | ३३ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ अभ्यासपूर्ण लेखांसाठी आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगी मूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगी मूल्ये द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगी मूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर नौपाडा, ठाणे ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेची देणगी मूल्य पाठवावी.
- www.vpmthane.org या संकेत स्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगी मूल्याच रु. २५०/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.

– संपादक

# क्युफू येथील धार्मिक स्थळाला भेट

*चीन मधील क्युफू येथे धार्मिक स्थळाला दिलेल्या भेटीचे वर्णन - संपादक*

२००९ च्या ऑगस्ट महिन्यात जीनानला जाण्याची संधी मिळाली. जीनान हे शहर एक औद्योगिक शहर म्हणून ओळखले जाते. या शहराजवळच क्युफू नावाचे प्रसिद्ध धार्मिक स्थळ आहे. बौद्ध धर्माचा चीनमध्ये प्रसार होण्याआधी त्यांच्याकडे कन्फ्युसिअस (Confucious) नावाचा धर्म प्रचलित होता. या धर्माच्या संस्थापकाचे नाव कल्फुसिअस असेच होते. क्युफू हे या धर्माचे केंद्रस्थान होय. हे ठिकाण जीनानपासून सुमारे दोनशे किलोमीटरवर आहे. जीनान भेटीमध्ये एक दिवस राखून आयोजकांनी क्युफूची सहल आयोजित केली होती. या ठिकाणाला दिलेली भेट खरोखरच संस्मरणीय होती. त्याचेच वर्णन या लेखात केलेले आहे.



**शहराच्या बाहेर पडताना असलेला टोल नाका**

लांबचा प्रवास करायचा आहे म्हणून आम्ही हॉटेलमधून लवकरच निघालो. गावाच्या बाहेर पडायला आम्हांला साधारणपणे अर्धा तास लागला असेल. गाव पार करून आमची बस एक रुंद अशा महामार्गाला लागली. रस्त्याच्या मधोमध फुलझाडे आणि रस्त्याच्या दुतर्फा चांगली वनश्री अशा महामार्गावरून आमचा प्रवास सुरू झाला. महामार्ग केवळ रुंदच नव्हे तर गुळगुळीत होता. त्या रस्त्यावरून आमची बस वेगाने मार्गक्रमण करीत होती. रस्त्याच्या दुतर्फा विजेचे खांब होते. प्रत्येक खांबावर सोलर पॅनेल बसविले होते. दिवसाचा उजेड असल्याने दिवे चालू नव्हते. परंतु रात्रीच्या वेळेस नेहमीच्या विजपुरवठ्याशिवाय हे दिवे पेटत असावेत याचा आम्हांला अंदाज आला. सूर्याच्या प्रकाशाचे सोलर पॅनेलमुळे विजेत रूपांतर होते. ही वीज खांबाच्या खालच्या बाजूला असलेल्या बॅटरीत साठवून ठेवली जाते. त्यावर खांबावरचे दिवे लागतात. मैलोगणती असे सोलारचे दिवे लावलेले पाहून जरा आश्चर्यच वाटले. दिव्याच्या खांबाचा आकार आणि त्यावर लावलेले दिवे यामुळे रस्त्याच्या सौंदर्यात भरच पडत होती.



**सोलर पॅनेल लावलेले विजचे खांब**

गावापासून जरा दूर गेल्यावर दोन्ही बाजूला शेते दिसू लागली. या शेतात मका आणि कडधान्य यांची पिके उगवलेली होती. रस्त्यावर एक नदी लागली. या नदीच्या

खोऱ्यात तर चांगलीच पिके डवरली होती. मधूनमधून डोंगर लागत होते. मध्ये लहान लहान गावे लागली. परंतु मोठे शहर एकही लागले नाही.





**वाटेवरील विलोभनीय दृश्य**

साधारणपणे तीन तासांच्या प्रवासानंतर आम्ही क्युफूला पोहोचला. चालकाने गावात जाणाऱ्या मार्गावर बस वळविली आणि चित्रच पालटले. गावात प्रवेश करताच आपण प्रेक्षणीय स्थळाकडे जात आहोत याची जाणीव होते. सोनरी रंगाने नक्षीकाम केलेले सुंदर विजेचे खांब आपल्या नजरेस पडले. त्याचबरोबर वेगवेगळ्या रंगांनी सजविलेले रिक्षेही आपल्या नजरेत पडतात. पर्यटन केंद्राजवळ चालकाने बस थांबविली आणि आम्हांला खाली उतरायला सांगितले. धार्मिक स्थळाचे पावित्र्य राखण्यासाठी आणि प्रदूषण टाळण्यासाठी या स्थळाच्या पुढे वाहन न्यायला बंदी आहे. पुढच्या प्रवासासाठी प्रदूषणविरहित वाहनांची व्यवस्था केलेली आहे. त्या वाहनात बसून आम्ही धार्मिक स्थळापर्यंत पोहोचलो.





**क्युफ्यू शहरात प्रवेश**

क्युफूमधील धार्मिक स्थळाला एक परकोट बांधलेला असून त्या परकोटाला दारे आहेत. त्यांतील एका दारातून आपल्याला प्रवेश घ्यावा लागतो. दारातून आत जाताच एक मार्गदर्शक नकाशा आपल्याला पाहायला मिळतो. त्यावर कोठे काय आहे याची सविस्तर माहिती दिलेली आहे. पुढे पाहावे तर एक प्रकारचे जंगल आपल्याला दिसते. आता येथे जंगल जरी वाढले असले तरी प्रत्यक्षात ही स्मशानभूमी आहे. कन्फ्युसिअस घराण्यातील लोकांचा मृत्यू झाल्यानंतर त्यांचे शरीर येथे पुरून ठेवण्यात येत असे. मागील काही वर्षांपासून या दफनभूमीचा वापर होत नसल्याने आजूबाजूला जंगल वाढले आहे. या जंगलातून मार्गक्रमण करीत आपण जेव्हा

शहाणा माणूस चुका विसरतो; पण त्याची कारणे नाही.

पुढे जातो तेव्हा परत एक मंदिराचे प्रवेशद्वार दिसते. प्रवेशद्वार लहान आहे परंतु आतला परिसर मात्र विस्तीर्ण आहे. या विस्तीर्ण परिसरात आपले लक्ष वेधून घेतात ते म्हणजे शिलालेख.





**प्रवेशद्वार आणि स्मशानभूमी**

कन्फ्युसिअस नावाचा एक विचारवंत ख्रिस्तपूर्व काळात चीनमध्ये होऊन गेला. त्याचे जन्मवर्ष ख्रिस्तपूर्व ५५१ आणि मृत्यूवर्ष ख्रिस्तपूर्व ४७९ असे सांगितले जाते. याचाच अर्थ या स्थळाला कमीतकमी २५०० वर्षाचा इतिहास आहे. याच गावात कन्फ्युसिअस यांचा जन्म झाला. सामाजिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी देशभ्रमण केले. परंतु सरतेशेवटी याच ठिकाणी येऊन ते स्थायिक झाले. त्यांचा मृत्यू येथेच झाला व त्यांना याच परिसरात पुरण्यात आले. कन्फ्युसिअस यांचे थडगे चांगल्या अवस्थेत ठेवल्याचे आढळते. या थडग्यापर्यंत पोहोचण्याच्या आधी आपल्याला एक मोठा शिलालेख आढळतो. त्याच्यापुढे दगडात कोरलेली कासवाची मोठी मूर्ती आहे. कन्फ्युसिअस धर्मात कासवाला बरेच महत्व आहे. त्याचे कारण शोधण्याचा आम्ही प्रयत्न केला असता असे कळले की कासवाची प्रतिमा दीर्घायुष्याचे प्रतीक आहे. कारण कासव स्वत: सर्व अडचणींवर मात करून अनेक वर्षे जगते. शिलालेखावर नेमके काय लिहिले आहे याची माहिती मिळू शकली नाही. परंतु त्यावर काही धार्मिक सूचना असाव्यात असा अंदाज आम्ही केला. तेथे उभे राहून आपले छायाचित्र काढण्याची संधी मात्र आम्ही गमावली नाही.





**शिलालेख आणि थडगे**

कन्फ्युसिअसचे मंदिर हे या परिसरातील मोठेच आकर्षण आहे. मंदीराची रचना चीनमधील इतर मंदिराप्रमाणेच आहे. परंतु मंदिराच्या दर्शनी भागात स्वस्तिकची चिन्हे आपल्याला ठळकपणे दिसतात. या

देहाचा स्वभाव तसे त्याचे कर्म असते.

मंदिरात स्वस्तिक कसे हा प्रश्न आम्हांला पडल्यावाचून राहिला नाही. परंतु त्याचे समाधानकारक उत्तर आम्हांला मिळू शकले नाही. बहुधा त्यावेळेस भारत आणि चीन यांचे व्यापारी संबंध चांगले असल्याने विचारांची आणि बांधकामांची देवाणघेवाण होत असावी. कन्फ्युसिअसचे मंदिर फारच मोठे आहे. आत कन्फ्युसिअसचा मोठा रंगीत पुतळा आहे. आजूबाजूला अनेक चित्रे लावलेली आहेत. या मंदिरात प्रवेश करताक्षणीच आपण एका चांगल्या धार्मिक स्थळाला भेट देत असल्याचे जाणवते. आमच्या मार्गदर्शकाने आम्हांला चांगली माहिती दिली. संपूर्ण परिसर स्वच्छ ठेवल्याचे आढळले. एकूण काय, तर चिनी लोक आपल्या धार्मिक स्थळांना चांगलेच महत्त्व देतात असे दिसते.





**मंदिराचा दर्शनी भाग**

कन्फ्युसिअस विचारसणीचा चीनमध्ये प्रसार होतो आहे तोच मोठ्या संख्येने भारतातून बौद्ध भिक्षूक आले. त्यांनी चीनमध्ये आणखी भिक्षूक तयार केले. या सर्वांनी मिळून चीनमध्ये बौद्ध धर्माचा प्रसार केला. बौद्ध धर्माची विचारसरणी तिथल्या सामान्य लोकांच्या मनाला भिडली. त्यामुळे लोकांनी मोठ्या संख्येने बौद्धधर्माचा स्वीकार केला. आजही चीनमध्ये बौद्धधर्माचे लोक मोठ्या संख्येने आहेत. मागील काही वर्षांपासून कन्फ्युसिअस धर्माचे पुनरुजीवन करण्याचा हेतुपुरस्सर प्रयत्न करण्यात येत आहे. कन्फ्युसिअस धर्माची शिकवण नेमकी काय आहे याची माहिती सर्वसामान्यांना देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. तसचे बौद्ध आणि इतर धर्मियांनी कन्फ्युसिअस धर्माचा स्वीकार करावा यासाठीदेखील प्रयत्न करण्यात येत आहेत. त्यांच्या प्रयत्नांना जेव्हा यश येईल तेव्हा येईल. परंतु आजच्या घडीला मात्र बौद्ध धर्माच्या तत्त्वाचा पगडा लोकांवर चांगलाच असल्याचे जाणवते. हा धर्म भारताने आपल्याला दिला म्हणून भारतीयांबद्दल एक प्रकारची कृतज्ञता चिनी लोकांमध्ये आढळते. या सद्भावनेचा उपयोग करून भारतीय आणि चिनी लोकांमधील संबंध बळकट करणे सहज शक्य आहे. अशी संधी आता आपण घालविली तर परत मिळणार नाही.

**डॉ. सुधाकर आगरकर**
सी–१४, विसावा वैभव नगरी,
कल्याण शीळ रोड,
काटई, ता. कल्याण
जि. ठाणे – ४२१२०४

●●●

*दिशा संपर्क दूरध्वनी*
**०२२-२५४२ ६२७०**

# थंडीच्या लाटा हलव्यावर काटा

*पूर्वी तिळाला काटे आणूल हलवा घरी केला जाई. आता ही परंपराच लुप्त झाली. या परंपरेच्या काही आठवणी*

आजकाल गणपती जवळ आले की बाजारपेठेत रस्त्यारस्त्यावर गणपतींच्या मूर्ती, मखरं जागोजागी दिसायला लागतात. दिवाळी आली की पणत्या फटाके, फराळाचे पदार्थ दिव्यांच्या माळा दुकानात दर्शनी हजेरी लावतात. ख्रिसमस आला की सांताक्लॉजच्या लाल गोंडेदार टोप्या, ख्रिसमस ट्री, केकस् यांनी दुकानं फुलून जातात. बाजारात ह्या सर्वांबरोबर ठिकठिकाणी कपड्यांच्या साड्यांच्या दुकानात सेल लागलेले नि गर्दीने नुसते गजबजलेले दिसतात. ते प्रत्येकच सणांच्या मोसमात हे तर आजकालचं सरावाचं दृश्य आहे. त्यापाठोपाठ येते ती संक्रान्त. जुन्या वर्षाला निरोप देऊन नवीन वर्षाचं स्वागत करणारा वर्षाचा पहिला सण. डिसेंबरच्या मध्यापासूनच या सणाच्या आगमनाची वार्ता बाजारपेठा सांगू लागातात. काळ्या खडीच्या साड्या किंवा चंद्रकळा साड्या दुकानांदुकानांतून दर्शनी शोकेसमधून झळकू लागतात. कडक तीळाचे लाडू हारीने मांडलेले दिसतात. हलव्याचे दागिने छोट्या बाळासांठी व नववधुसाठी मांडलेले दिसायला लागतात. आता कोणता सण येणार आहे याचं सूतोवाच या सर्व वातावरणामुळे आपोआपच होतं. आजाकल रेडिमेडचा जमाना आहे.

वटपौर्णिमेला वडाच्या फांद्या हातगाडीवर दिसायला लागतात, तशीच संक्रान्तीच्या आदल्या दिवसापासून बाजारात रस्तोरस्ती सुगडी (सुघड) दिसायला लागतात. ओल्या हरभऱ्यांचे सोले म्हणजे डहाळ्या किंवा घाटे म्हणजे फांदीचे काढलेले (सालासकट) ओले हरभरे हातगाडीवर विकायला आलेले दिसतात. बोराच्या गाड्या पण दिसतात, ऊस पण दिसायला लागतात. कारण हे सर्व संक्रान्तीच्या पूजेला लागतं ना स्त्रियांना; विशेषतः नववधूंना, संक्रान्तीचं वाण द्यायला.

हे सगळं दृश्य मी मुंबईत दरवर्षी बघते नि मला माझ्या लहानपणची आठवण येते. म्हणजे अगदी ५५-६० सालचा काळ. मी प्रायमरीत दुसरी-तिसरीत असेन त्यावेळचा. त्यावेळी मध्यमवर्गीय कुटुंबात म्हणजे खाऊन पिऊन सुखी कुटुंबात सर्व काही घरीच करण्याची पद्धत होती. आमचे पाच जणाचं कुटुंब. आई वडील नि आम्ही तीन भावंडं. माझी लहान बहीण भाऊ नि मी असे तिघं. त्यावेळी माझी आई डिसेंबरच्या मध्यापासूनच हलवा बनवायची तयारी करायची. खडखडीत वाळलेले तीळ, पितळेचं तसराळं, पांढरं शुभ्र धोतराचं फडकं, कोळशाची शेगडी, साखरेची मळी काढून गाळून घेतलेला कच्चा पाक, लाल भोपळ्याच्या सोलून ठेवलेल्या बिया, लवंगा, तीळ, वेलदोडे वगैरे साहित्य सज्ज करुन स्वयंपाक घरातली मागची सर्व झाकपाक करुन ती रात्री साधारण आम्ही सर्व झोपल्यावर हलवा करायला बसायची. सुरुवात करताना मी समोर बसायची. शेगडी पेटवून त्यावर ते तसराळे किंवा छोटी परात ठेवून पाट मांडून ती खाली बसायची. शेजारी पाक ठेवलेला असायचा. कल्हईच्या पातेलीत भोपळ्याच्या बिया, लवंगा, वेलदोडे (त्याचे दाणे), तीळ त्या तसराळ्यात घेऊन त्यावर एक एक चमचा पाक टाकून ती ते गरम गरम मिश्रण हलवत बसायची. पाक कोरडा झाला की परत चमचाभर घालायचा, पुन्हा हवायचं. काही वेळानं त्या पदार्थांवर पांढरा साखरेच्या

कुसंगतीत राहून सतत दुसऱ्याची निंदा करत राहिला, तर मन कधीच शुद्ध होणार नाही.

पाकाचा थर दिसायला लागायचा. मग मला झोप यायला लागायची. मी झोपायला जायची. सकाळी उठल्यावर आई पांढऱ्या फडक्यात गुंडाळून ठेवलेला हलवा आम्हांला दाखवायची. रोज हलवा मोठा मोठा झालेला, वाढलेला दिसायचा. हलव्यावर अगदी सुरेख काटा आलेला कळायचा. थंडीचे दिवस असायचे ते, अगदी नागपूरच्या थंडीचे. थंडीच्या लाटा नि हलव्यावर काटा दोन दोन दिवसांनी वाढायचा.

हलव्यासाठी आईची रोजची जागरणं चालू असाची. दिवसभराच्या कामाने ती थकून दमून जायची. पण संक्रान्त आहे म्हणून ती कुठून एवढं बळ आणायची कोणास ठाऊक! मग आईचा पांढरा शुभ्र काटेरी सुंदरसा हलवा तयार व्हायचा. तो झाल्यावर आई त्याचे दागिने बनवायला घ्यायची. जाडसर दुहेरी दोरा पायाचा अंगठ्यात धरून त्या दोन दोऱ्यात ती हलवा बसवायची मग दोन्ही दोरे एकत्र करुन त्यातून सोनेरी कापलेले जीगेचे तुकडे दर एक हलव्या नंतर एक जीग असे घालाची. असे करता करता माळ वाढत जायची. असे सर बनवून ती त्याचे किती प्रकार प्रकारचे दागिने बनवायची. माझा ते सर्व दागिने घतलेला म्हणजे हलव्याची बिंदी, कमरपट्टा, बांगड्या, कानातले डूल, गळ्यात साज किंवा ठुशी घातलेला फोटो मी अजूनही जपून ठेवलेला आहे. मी राधा नी माझी लहान बहिण कृष्ण. तिला पण मुकुट, हार क्रेपची फुले घातलेला हातात कडी किंवा बिनल्या, हलव्याचे सर लावलेली उद्बत्तीच्या पुड्याची पुंगळी घेऊन त्याला सोनेरी कागद लावून बनवलेली बासरी हातात घेऊन तिचाही फोटो काढलेला आहे.

आमच्या लहानपणापासून आई हलवा स्वतः बनवून त्याचे दागिने बनवायची. पण नंतर आम्ही मोठे झाल्यावर आई शिकायला लागली. प्रायव्हेटली ती बी.ए., एम्.ए. झाली. अगदी मराठीची फर्स्ट क्लास फर्स्ट गोल्ड मेडॅलिस्ट. लागलीच तिला नागपूरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेजात मराठीची लेक्चरर म्हणून नोकरीही लागली. माझे वडील बरेचदा आजारी असायचे तरी हे सर्व सांभाळून ती शिकली. एवढं यश मिळवलं. ती लेखिका, कवयित्रीही होतीच. मासिकातून नेहमीच तिच्या कविता प्रसिद्ध व्हायच्या. ह्या सर्वांतून वेळ काढून ती हौस म्हणून हे सर्व करायची. हाताची बोटं हलवा करताना लाल लाल व्हायची, जागरणानं डोळे. तरी हौशीला मोल नसतं म्हणतात ना! मी मोठी. माझ्या लग्नानंतर पहिल्या संक्रान्तीला मी बाळंतपणाला आईकडे आलेली होते. सासरी माझं फुलांची वाडी भरून डोहाळे जेवण झालं. ती वाडी माझ्या मावस सासुबाईंच्या ९वीतल्या नि ६ वीतल्या मुलीने नि मुलांनी स्वतः बनवली होती खूप हौशीनं कौतुकानं. त्याचं मलाही खूप कौतुक वाटलं. तो पण फोटोचा थाट झाला तेव्हा. मग आईकडे आल्यावर आईने मोठे संक्रान्तीचे हळदीकुंकू केले. पूर्वी लहान असताना आम्ही भावंडे घरोघरी बोलावणी करायला उड्या मारत जायचो, संक्रान्त व चैत्राच्या हळदीकुंकवाची. पहिली संक्रान्त म्हणून आईने हलव्याचे सर्व दागिने अगदी वाकी, तोडे, बांगड्या, मंगळसूत्र, बिंदी, तन्मणी, कमरपट्टा, जोडवी वगैरे माझ्यासाठी नि जावयांसाठी हलव्याचा हार, गुच्छ, घड्याळ, हलव्यांच्या निरनिराळ्या आकाराच्या रेशमी पिशव्या (हवा भरून केलेल्या) वगैरे स्वतः आम्ही तिथे पोचायच्या आधीच बनवून ठेवल्या होत्या. हे सर्व करून ती मला मुंबईला माहेरी न्यायला आली होती.

लग्नानंतरची पहिली संक्रान्त म्हणून मी पाच घरी पाटावरची वाण वाटली. हळदीकुंकवाच्या पुड्या लुटल्या. आईने सुगडं दिली वाण म्हणून, नी कंगवे लुटले. फक्त माझंच एवढं कौतुक केलं नाही तर माझ्या बहिणीच्या नि वहिनीच्यासाठी पण तिने हे सर्व दागिने बनवले. नंतर अगदी आमच्या मुलांसाठी पण बोरनहाण करायला हलव्याचे दागिने बनवून पाठवले. त्यावेळचे काढलेले फोटो अजूनही पाहताना तिच्या हिमतीचं, मेहनतीचं, कलाकौशल्याचं

कौतुक वाटतं. तिनं केलेल्या तीळाच्या वड्यांची चव अजून जीभेवर रेंगाळतेय. खमंग, खुसखुशीत अलवार तीळाच्या वड्यासाखरेच्या कधी गुळाच्या. दोन्ही पण लाजवाब. नागपूरकडे तीळगूळ म्हणून अशा वड्या किंवा गुळाचे मऊसर लाडू देतात. मुंबईकडे तीळाचे कडक लाडू असतात. संक्रान्तीला आईची आठवण दुकानातले दागिने पहाताना होते नि डोळे पाणावतात. तिचे शब्द आठवतात. ''तीळगूळ घ्या गोड बोला...''

**श्रीमती आशा भिडे**
बी/९ विजय अर्पाटमेंटस्,
आराधना टॉकीजजवळ,
ठाणे (प.) ४०० ६०२
दूरध्वनी - २५४१०१४०
मोबाईल - ९३२४०४४७६४

●●●

### ब्रह्मकमळ

औषधी उपयोग असूनही वैज्ञानिकांकडून ब्रह्मकमळ दुर्लक्षितच राहिले. आजवर त्याचे संवर्धन करण्याचे प्रयत्न वा संशोधन करून त्यातील औषधी गुणवत्तेवर साहित्य निर्माण करण्याचे प्रयत्न झालेले दिसत नाहीत. त्यामुळेच याची लागवड संवर्धनातील अडथळे, हवेतील बदल, वैज्ञानिक चिकित्सेचा अभाव यामुळे या वनस्पतीचा समावेश कन्झर्वेशन असेसमेंट मॅनेजमेट प्लान (कँप) यांनी 'धोक्यात असणाऱ्या प्रजाती' यात केला आहे. ब्रह्मकमळाचा औषधी उपयोगासाठी वापर न झाल्यास त्याचा नाश होण्याची ही शक्यता पाहता संवर्धनाच्या योजनांना प्राधान्या द्यावयास हवे. त्यासाठी रोपवाटिकांची निर्मिती करून प्रसार व संवर्धनाच्या पद्धतींसाठी प्रयत्न व्हायला हवेत. त्याचबरोबर संशोधन व विकास (R अँड D) क्षेत्राकडून वैद्यकीय क्षमता जाणून स्थानिक लोकांना याबद्दल जागरूक करणे आवश्यक आहे.

**संदर्भ** : मनूपंत व प्रभाकर सेमवाल-**करंट सायन्स.** खंड १०४/६, २५ मार्च २०१३. पृ. ६८५

### *मानवी शरीराचे भौतिकशास्त्र*

*मानवी शरीराचा भौतिक प्रक्रियांच्या संदर्भात अभ्यास करणे हे आधुनिक वैद्यकशास्त्रातील जुन्या कल्पनां इतके पुरातन आहे. जुने प्रश्न नवीन संदर्भात तपासून पाहणे हा प्रवाह तुलनेने आधुनिक आहे. भौतिकशास्त्र, जैव गतिशास्त्र, रक्तप्रवाहशास्त्र व जैव विद्युतशास्त्र या संदर्भात हा अभ्यास आहे. 'फिजिक्स ऑफ ह्युमन बॉडी' हे पुस्तक त्या दृष्टीने वेळेवर आले आहे. पुस्तकाचे लेखक रिचर्ड एमसी कॉल यांनी यात मोठ्या प्रमाणात क्लसिकल व फ्लुइड गतिशास्त्र याचा अभ्यास मांडला आहे. लेखकाने म्हटल्यानुसार हे पाठ्यपुस्तक नसले तरी यात अनेक विषयांचा विस्तृत अभ्यास मांडला आहे. प्रत्येक प्रकरणाची सुरुवात पदार्थ विज्ञानातील मूलभूत संकल्पनांनी होते. त्यासाठी शालेय स्तरांचे पदार्थविज्ञान गृहीत धरले आहे. प्रकरणाच्या उत्तारार्धात मानवी शरीरशास्त्र याचा वैद्यकीय अवस्था व रोग यांच्या विवेचनाने शेवट केला आहे. पुस्तकात संबंधित विषयाच्या गणिती विवेचनाला महत्त्व दिले नसून संकल्पनांवर अधिक भर दिला आहे.*

***संदर्भ** : फिजिक्स ऑफ ह्युमन बॉडी-(पुस्तक परीक्षण)-चैतन्य आठले.*
***करंट सायन्स** खंड १०४/६, २९ मार्च २०१३ पृ. ७७३.*
*<u>पुस्तकाचे प्रकाशक : जॉन हॉपकिन्स युनिव्हर्सिटी प्रेस, बाल्टिमोर.</u>*

भीतीमधून काळजी निर्माण होते; आणि काळजीने ग्रासले की समाधान अंतर्धान पावते.

# श्रीमत् भगवद् गीता - अध्याय सहावा
# विषय : आत्म संयमन योग

*कै. शंकरराव मठांच्या गीतेवरील लेख मालेतील सहावा लेख - संपादक*

**श्लोक १ ते ४ निष्काम कर्म योग व योगारुढ पुरुषाची लक्षणे**

जो कर्माचा त्यागपूर्वक आपले कर्तव्य कर्म करतो तोच संन्यासी आणि तोच योगी असे समज. हे अर्जुना ज्याला संन्यास म्हणतात त्यालाच तू योग असे समज. कारण मनाचे संकल्प सोडल्यावाचून कोणीही योगी होऊ शकत नाही. योग साधना करण्याची इच्छा करत असलेल्या मुनीला कर्म हे साधन होते आणि योग साधन पूर्ण झाल्यावर त्याचे साधन शमते, शांत होते. तेव्हा मनुष्य इंद्रियांच्या विषयात आणि कर्मात आसक्त होत नाही आणि सर्व संकल्पांचा त्याग करतो. तेव्हा त्याला योगारुढ असे म्हणतात.

**श्लोक ५ ते १० आत्म उद्धाराची प्रेरणा, भगवत् प्राप्ती करुन घेणाऱ्याची लक्षणे**

मनुष्याने स्वतःचा उद्धार स्वतःचा उद्धार स्वतःच करावा. आपण आपले पतन केव्हाही होऊ देऊ नये. कारण प्रत्येक मनुष्य स्वतःच आपला उद्धारक आहे आणि स्वतःच आपला घातक आहे. ज्याने स्वतःला जिंकले तो स्वतः उद्धारक होतो पण ज्याने स्वतःला स्वेच्छाचारी बनविले, तो स्वतःच आपला घातक शत्रू होतो. थोडक्यात आपण आपले मित्र वा शत्रू होत असतो. ज्याने स्वतःला जिंकले आणि ज्याने पूर्ण शांती मिळविली तो महान होतो. तो शीत उष्ण, सुख दुःख, मान-अपमान या विषयी तो सम दृष्टीने पाहातो. जो ज्ञान आणि विज्ञान यांनी तृप्त झाला तो सर्वोच्च स्थानात स्थिर होतो, तो सारी इंद्रिये जिंकतो. त्याला माती दगड व सोने इत्यादि सारखीच होतात. असा जो योगी असतो, तोच सिद्ध योगी होय. जो प्रिय सखा, मित्र, शत्रू, उदासीन, मध्यस्थ, द्वेषार्ह बांधव, साधु आणि पापी लोक यांच्या विषयी समभाव ठेवतो तो विशेष योग्यतेचा मनुष्य होतो. योगी माणसाने एकान्तात एकटे राहून चित्त आणि मन याचा संयम करावा, भाग्य वासना सोडावी, भाग्य वस्तूंचा संग्रह करू नये आणि सतत योगाभ्यासातच रमावे.

**श्लोक ११ ते ३२ ध्यान योग सविस्तर वर्णन**

प्रथम दर्भ, त्यावर हरिणाचे कातडे आणि त्याच्याहीवर वस्त्र घालावे. फार उंचही नाही फार सखलही नाही असे आपले आसन शुद्ध जागी, स्थिर मांडावे. त्या असनावर बसून चित्त आणि इंद्रिये यांच्या हालचाली आवरून धराव्यात. मन एकाग्र करून आत्मशुद्धीसाठी योगाचे साधन करावे. स्थिर रहावे, शरीर डोके व मान ही एका रेषेत निश्चल ठेवावे, आपल्या नासाग्रावर दृष्टी स्थिर करावी. इकडे तिकडे कोठेही न बघता, भीती न बाळगता, शांत अंतःकरणाने ब्रह्मचर्य व्रत पाळावे. मनावर संयम करून माझ्या ठिकाणी चित्त लावावे. माझ्यावर तन्मय व्हावे. योगमुक्त होऊन बसावे. याप्रमाणे नित्ययोग तत्पर असणारा, मन ताब्यात ठेवणारा योगी माझ्या ठिकाणी असलेली मोक्ष स्वरूपी परमशांती प्राप्त करतो. हे अर्जुना खूप खाणाऱ्याला आणि मुळीच न खाणाऱ्याला अत्यंत निद्रा घेणाऱ्या व मुळीच न झोप घेणाऱ्याला योग साध्य होत नाही. योग्य प्रकारचा आहार विहार करणारा योग्य कर्मे करणारा योग्यवेळी निद्रा घेणारा योग्य वेळी उठणारा याला हा योग दुःखाचा नाश करणारा होतो. ज्यावेळी सर्व प्रकारे स्वाधीन झालेले चित्त आत्म्यातच स्थिर होते आणि

साधक सर्व भोग वासनेपासून पूर्णपणे निवृत्त होतो, तेव्हा तो योग मार्गात उत्तम प्रकारे प्रविष्ट करतो. निवांत जागी ठेवलेला किंवा निश्चल राहतो हीच उपमा आत्मयोगाचे अनुष्ठान करणाऱ्या योग्याचे चित्त स्थिर झालेले असते व अशा प्रकारे योगाभासाने स्वाधीन झालेले चित्त स्थिर होते. तेंव्हा तो आत्म्याने आत्म्याचा साक्षात्कार करून आपल्या आत्म्यातच संतुष्ट होतो. त्या अवस्थेत केवळ बुद्धिगम्य आणि इंद्रियाना अगोचर असे जे सुख असते, याचा त्याला अनुभव येतो आणि त्या अवस्थेत स्थिर झाल्याने हा योगी आत्मतत्वापासून केव्हाही ढळत नाही आणि ती स्थिती प्राप्त झाली असता त्यापेक्षा दुसरी कोणतीही गोष्ट त्यास अधिक वाटत नाही. या अवस्थेत स्थिर झालेला योगी मोठ्या दुःखानेही विचलित चित्त होत नाही. दुःख संबंधाचा नाश करणारा हा योग असे समजावे. या योगाचे अनुष्ठान वाचकाला प्रसन्न चित्ताने आणि दृढनिश्चयाने करणे उचित आहे. संकल्पापासून उत्पन्न होणाऱ्या सकळ कामनांचा संपूर्ण त्याग करून मनानेच सर्व इंदियांचे सर्व प्रकारे चांगले नियमन करून धैर्ययुक्त बुद्धीने हळूहळू विषयापासून शांत होत जावे आणि मन आत्म्याच्या ठिकाणी स्थिर करून दुसरा कोणताही विचार करू नये. चंचल व अस्थिर मन इकडे तिकडे जाऊ लागल्यास तेथून त्याला परत आणून आत्म्याच्या ठिकाणी लावावे. याप्रकारे ज्याचे मन शांत, निष्पाप, रजोगुणरहित झाले त्या ब्रह्मरूप झालेल्या योग्याला उत्तम सुख मिळते. सतत आत्मयोगाचा अभ्यास करणारा योगी पापासून मुक्त होऊन ब्रह्मसंयोगामुळे अत्यंत सुखी होतो. जो योगयुक्त झाला, तो सर्वत्र समदृष्टीने पाहतो. म्हणजे तो आपल्याला सर्वभूतांच्या ठायी आणि सर्व भूताना आपल्या ठायी पाहातो. जो परमात्म्याला सर्वांच्या ठिकाणी आणि सर्वांना परमात्म्याच्या ठिकाणी पाहातो त्याच्या दृष्टीने परमात्मा कधी नष्ट होत नाही. जो या एकत्व बुद्धीने स्थिर झालेला योगी सर्व प्राणिमात्रात वास करणाऱ्या ईश्वराला भजतो तो योगी सर्व प्रकारे व्यवहारात असताही ईश्वराच्या ठिकाणीच असतो. हे अर्जुना, जो आपल्याप्रमाणेच सर्वांना सारखे सुखदुःख होत आहे असे पाहतो तो योगी परमश्रेष्ठ होय.

### श्लोक ३३ ते ३६ मनाचा निग्रह

अर्जुन म्हणाला – हे मधुसूदना समत्व बुद्धीने प्राप्त होणारा जो हा योग तू मला सांगितलास तो माझ्यामध्ये असलेल्या अस्थिर मनाच्या चंचलपणामुळे मला जमेलसे वाटत नाही. हे कृष्णा मन चंचल, बलिष्ठ व दृढ आहे. त्याचा संयम करणे मला तर वाटते वाऱ्याची मोट बांधण्यासारखे, अगदी दुर्घट आहे. श्रीकृष्ण म्हणतो हे अर्जुना हे मन नि: संशय चंचल आणि संयम करावयास कठीण आहे. पण हे कुन्तिपुत्रा अभ्यासाने व वैराग्याने ते वश करता येते. स्वत:चा संयम न करणाऱ्या मनुष्याकडून योग आचरण होणे असंभवनीय आहे, पण जो स्वत:ला स्वाधीन ठेवतो आणि प्रयत्न करतो, त्याला अनेक उपायांनी योग सिद्ध करता येणे शक्य आहे असे मला वाटते.

### श्लोक ३७ ते ४७ योगभ्रष्ट पुरुषाची माहिती व ध्यान योगाची महत्ता.

अर्जुन विचारतो, हे कृष्णा एखाद्या श्रद्धा युक्त साधकाकडून पुरा यत्न झाला नाही आणि त्याचे मन योगापासून वळले तर तो योग सिद्धीला प्राप्त न होता कोणत्या गतीला जातो? हे कृष्णा, ब्रह्मप्राप्तीच्या मार्गात आश्रयहीन व विशेष मोहित न होता तो दोहो बाजूनी भ्रष्ट होऊन छिन्न-भिन्न मेघाप्रमाणे मधेच नष्ट तर होत नाही ना? हे कृष्णा माझी शंका पूर्णपणे नाहीशी करण्यास तूच योग्य आहेस कारण तुझ्या वाचून हा संशय दूर करणारा कोणीही नाही. श्रीकृष्ण म्हणतो, हे पार्था दृहलोकी काय आणि परलोकी काय त्या योग्याचा विनाश होत नाही. कारण हे मित्रा चांगले कर्म करणारा कोणीही कधीही दुर्गतीला प्राप्त होत नाही. हा योगापासून च्युत झालेला पुण्यवानांना मिळणाऱ्या लोकांना प्राप्त होतो, तेथे पुष्कळ

काळ राहून पवित्र अशा श्रीमान् लोकांच्या घरी जन्म घेतो. अथवा बुद्धिमान योगियांच्या कुळातही जन्म घेतो. अशा प्रकारचा हा जन्म अत्यंत दुर्लभ आहे. हे कुरुकुलनंदना तेथे तो पूर्व जन्माचे बुद्धि संस्कार मिळवितो आणि पुढे अधिक सिद्धी मिळविण्याचा तो प्रयत्न करतो. पूर्व जन्मीच्या त्याच्या अभ्यासाने तो सिद्धीकडे खेचला जातो कारण योग जिज्ञासूदेखील शब्द पंडित्यापेक्षा श्रेष्ठ असतो. तो पुढील योग साधना करीत करीत पापमुक्त होतो. तो शुद्ध झालेला योगी अनेक जन्म सिद्धी प्राप्त करून घेत घेत शेवटी उत्तम गति प्राप्त करुन घेतो. अर्जुना तपस्वी लोकांपेक्षा योगीश्रेष्ठ, ज्ञानी लोकापेक्षाही श्रेष्ठ व कर्म करणाऱ्यापेक्षाही श्रेष्ठ आहे म्हणून तू योगी हो. या योग्यातही जो श्रद्धावान् परमात्म ठिकाणी अंत:करण एकवटून त्याला भजतो, तो परमात्म्याला अधिक मान्य होतो.

या अध्यायात ध्यान योगाचा विचार केला आहे. हे योग साधनेतील सातवे योगांग. योगाची आठ अंगे अशी – यम, नियम, आसन्, प्राणायाम, प्रत्याहार धारणा, ध्यान, व समाधी.

१) यम – अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, असंग्रह

२) नियम – पवित्र्य, संतोष, तप, अध्ययन ईश्वरभक्ती

३) आसन – स्थिरता प्राप्त करुन देणारी बैठक

४) प्राणायाम – श्वास घेणे, श्वास सोडणे या गतीतील निरोध

५) प्रत्याहार – आपआपले विषय सोडून चित्तातच इंद्रियांचे स्थिर होणे

६) धारणा – एखाद्या ठिकाणी चित्त स्थिर करणे

७) ध्यान – स्थिर चित्तात एकतेचा प्रत्यय घेता येणे.

८) समाधी – ध्यान करीत आहोत हे विसरणे आणि एकत्वाचाच अनुभव घेणे.

धारणा, ध्यान, समाधी ही तिन्ही एके ठिकाणी केन्द्रीभूत होणे याचे नाव संयम (पातंजल योग सूत्रे)

योग विद्या ही व्यक्तीची परम उन्नती करणारी आहे. गीतेचे एक अंग मानवाची परमोन्नती असल्याने या अष्टांग योगाचे साधन विशद केले आहे. गीतेत योग विषयक साधना भाग सांगितला आहे, तेवढा तो प्रत्येक मनुष्याला आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्ती विशेष पद्धतीने साधन करत असो वा नसो परंतु गीतेतील साधना अवश्यमेव आचरणीय आहे. गीतेतील योग संबंधी विचार असा आहे. राम – ब्रह्मचर्य अहिंसा च शरीरं तप उच्यते। (गी. १७–२) निराशी: अपरिग्रह:। गी (६–१०) तै: तान् अप्रदायैभ्यो यो भुंक्ते स्तेन एव स:। (गी. ३ –१२) जो दान केल्यावाचून उपभोग घेतो तो चोर होय. नियम – पवित्रपणा – तेज: क्षमा धृति: शौचं। (गी. १६–३) संतोष – संतुष्टो येन केनचित्। (गी १२–१९) आत्मनि एव च संतुष्ट: ।(गी. ३–१७)

**तप** – स्वाध्याय: तप आर्जवम्। (गी. १६.१) स्वाध्यायाभ्यसनं चैव वाङमयं तप: (गी. १७.१५)

**ईश्वर** – समं सर्वेषु भूतेषु तिष्ठन्तं परमेश्वरम् (गी. १३.२७ ईश्वर: सर्वभूतानां हृद्येशे अर्जुन तिष्ठनि। गी (१८–६१)

**आसन** – शुचौ देशे प्रतिष्ठाप्य स्थिरं आसनं आत्मन:। (६.११)

**प्राणायाम** – अपाने जुव्हति प्राणं प्राणेऽ पानं तथाऽपेर। प्राणायाम गती रुध्वा प्राणायाम परायमा:। गी (४.२९)

ध्यान योगाने मनाची स्थिरता साधली जाते. मनाला एकाग्र करण्यासाठीच योग साधना करावयाची असते. अर्जुन म्हणतो – मन चंचल आहे त्याचा निग्रह करणे अति कठीण काम आहे. श्रीकृष्ण म्हणतो अभ्यासेन – वारंवार प्रयत्न करून आणि वैराग्येण मन विषयांपासून अलिप्त ठेवून ते स्थिर करता येते. यतो यतो निश्चरति मन चंचल अस्थिरं। ततस्ततो नियम्य एतत् आत्मनि एव वशं नयेत्। गी (६.२६)

**सम दृष्टि** – आपल्या सारखे सर्वांना सर्वत्र पाहणे, आपल्या सारखेच इतरानाही सुख दुःख भाव आहेत हे समजून व्यवहार करतो तोच खरा योगी होय. असे वर्तन योग साधनेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. समबुद्धीची आवश्यकता आहे. आपल्या संबंधित व्यक्तीशी वागतो तसेच इतर सर्वांशी वागणे या समबुद्धीने द्वेषाचे मूळच नष्ट होते.

**एकांत सेवन**– योगं साधनास एकान्त सेवनाची अत्यंत आवश्यकता आहे.

**निरंतर अभ्यास** – साधकाला सिद्धी प्राप्त होईपर्यंत निरंतर अभ्यास केला पाहिजे. साधना मधेच सोडता कामा नये. योगी युञ्जीत सततं आत्मानं रहसी स्थितः। गी.(६–१०)

**योग मार्गासंबंधी काही महत्त्वाच्या गोष्टी–**

१) हा योग केवळ आत्मोद्धारासाठीच शुद्ध हेतूने प्रेरित होऊन करावा, योगं आत्मनिशुद्धये।(६.१२)

२) मार्गदर्शक गुरू करावा. अन्यथा गुरू विरहित राहणे बरे.

३) शीतकाल योगाभ्यासास सर्वोत्तम, त्यातही विशेषतः प्रातःकाळ व त्यातही ब्राह्ममुहूर्त उत्तम.

४) गोंगाट इत्यादी स्थळ योग साधनेस अनुपयुक्त अशावेळी कर्ण बंधाचा उपयोग करावा.

५) डास इत्यादीपासून त्रास होऊ नये यासाठी अंग भरून पातळ उपरणे घ्यावे.

६) ध्यानास बसण्यापूर्वी निर्विघ्नमस्तु। म्हणून ठरावीक स्थानाभोवती ठळक रेषा खेचावी.

७) ध्यान योगाचा काळ निश्चित ठरवावा व वेळही निश्चित करावी.

८) शंका रहित होऊन ध्यानास बसावे.

९) ध्यान स्थळ शक्यतो वर्दळ रहित असावे.

१०) भुकेलेल्यावेळी व भोजनोत्तर लगेच घ्यान करू नये.

११) साधकाला संयमाने वागणे आवश्यक, कारण भोगी हा योगी होऊ शकत नाही.

१२) क्रोध होता कामा नये – अक्रोधेन जयेत् क्रोध। दया, क्षमा, शांती–तेथ देवाची वसति।

१३) योग साधनेच्या काळात संपूर्ण मौन पाळावे. मौनाने मनुष्यातील दिव्यशक्तीची वृद्धी होते. मौन म्हणजे आत्मवृत्तीचा विकास व प्रकाश होय. चित्ताची प्रसन्नता आत्म्याचा मूळ स्वभाव. अलौकिक दिव्य प्रभाव।आत्म संभाषणं मौनं मौनं भाषणमद्वयम्। आत्मसाक्षात्करं पूर्ण तस्मात् त्वं मौन माचर। मौनाशिवाय खरे ध्यान नाही, खऱ्या ध्यानाशिवाय खरे ज्ञान नाही. खऱ्या ज्ञानाशिवाय खरी मुक्ती नाही. न मौनेन विनाध्यानं ज्ञानं नैवच तत् विना। न ज्ञानेन विना मोक्षः तस्मात् मौनं मौनं समाचार। आठवड्यातून संपूर्ण एक दिवस तरी कडक मौन पाळावे। दिवं एकंच सप्ताहे मौनं आश्रय यजतः। पाटीवर अगर कागदावर लिहून दाखविणे, खुणविणे हे खरे मौन नव्हे.

१४) साधकाने संतुष्ट असावे. ‘न संतोषात् परंभाग्यं न संतोषात् परंधनं। न संतोषात् परं सौख्यं सन्तोषः परमेश्वरः।

१५) प्रेमपूर्ण आचरण आवश्यक. शुद्ध प्रेम पशूलाही मानव बनविते. प्रेम ही सर्व तापांचे शमन करणारी एकमेव दिव्य औषधी आहे. क्रोधाने आग पेटते, प्रेमाने आग विझते.

१६) आळसाचा पूर्ण अभाव पाहिजे – उद्योगे विद्यते योगः। आलस्यं हि मनुष्यामां शरीरस्यो महारिपुः। योगात सातत्याला अतिशय महत्व आहे. यानेच तेजोवृद्धी पूर्ण योगसिद्धि प्राप्त होते.

१७) स्वतःचे रहस्य पूर्ण अनुभव गुरूअथवा अनुभवी व्यक्ती खेरीज अन्य कोणासही सांगू नये. लवकर एकाग्रता प्राप्त होण्यासाठी त्राटकाचा विशेष उपयोग होतो. ही एक

सर्वोत्कृष्ट विलक्षण परिणामकारक दिव्य यौगिक प्रक्रिया आहे. अधु दृष्टीच्या लोकांनी मात्र दिव्यत्राटक करू नये.

**त्राटक करण्याची रीती** – चकचकीत बिंदु सुमारे पाच फूट अंतरावर ठेवावा. त्याकडे एकटक अचल पहावे. प्रथम डोळ्यात पाणी येईल, डोळे न पुसता न मिटता अभ्यास चालू ठेवावा. १ ते ५ मिनिटे अभ्यास करावा. मग हळू हळू तो वाढवावा. या क्रियेन योगामुळे ध्यान योगात अतिशीघ्र व पूर्ण एकाग्रता सहज साधते आणि भाव समाधिही लागू शकते. अभ्यासाची वेळ, जागा निश्चित एकच असावी. म्हणजे तेथे त्यावेळी विश्वातील दिव्यशक्तीचे प्रवाह साधकाच्या ठिकाणी नियमितपणे येवून ते अत्यंत प्रबळ होतात व साधकास अलौकिक दृष्टी प्राप्त होते.

अभ्यास साधल्यानंतर साधक इतर गोष्टीवर त्राटक करू शकतो. नक्षत्र त्राटक–याने विराट विश्वातील सर्व वस्तू बसल्या ठिकाणी पाहता येतात. बालसूर्यावर त्राटक– दिव्यज्ञान, विश्वज्ञान, दुःख दैन्य, दारिद्र्य यांचा नाश. चंद्रावर त्राटक–अंगकांती सतेज बनणे, दीर्घोयुष्य लाभणे.

**सर्वांना जमेल असे आदर्श त्राटक** – आरशात स्वतःच्या प्रतिबिंबातील भ्रूमध्यजागी त्राटक करावे. अभ्यास शांत व सावकाश व्हावा. ईश्वराच्या मूर्तीवर – भ्रूमध्यभागी त्राटक केल्याने ईश्वर साक्षात्कार होतो. त्रा–रक्षण करणे, टक– सतत अनवरत ध्यान. तत्वतः वस्तुतः स्वतःचा आत्मा हाच आपला खरा गुरू. आपल्या ठिकाणीच सद्गुरू वास करतो. त्यालाच शरण जावे. याचे कारण आपणच आपले खरे उद्धारक आहोत. आणि हेच गीतेचे व्यावहारिक तत्त्वज्ञान आहे. हेच खरे दिव्य आत्मज्ञान. ज्याच्या ठिकाणी स्वतःचे बल नाही त्याचा उद्‌धार होणे कालत्रयी कठीण. स्वतःशिवाय स्वतःचा उद्‌धार करण्यास जगात कोणीच समर्थ नाही. निर्भयता, अतूट आत्मविश्वास व आत्मश्रद्धा हीच उद्‌धाराची साधने आहेत.

योग मार्गात काही अडचणी येतात. त्या येणे प्रमाणे व्याधी, अनारोग्य, मानसिक जडता, संशय हे का ते अशी मनाची स्थिती, प्रमाद, निरुत्साह, आलस्य, अविरति भोगासक्ती, भ्रंती–भ्रम, अलब्ध भूमिका, एकाग्रता न साधणे, अनवस्थित अवस्थेपासून च्युत होणे, चित्त विक्षेप– अडथळे, इंद्रिये व मन यांचा निग्रह करणे म्हणजे दम, योग साधनेने मनाचे दोष क्षीण होतात ते पूर्ण नष्ट झालेले नसतात. म्हणून शम अत्यंत आवश्यक. काही योगी पुनरपि विषयासक्त झालेले आढळतात त्याचे हेच कारण आहे. योग मार्गात कोणतीही विघ्ने येऊ नयेत म्हणून ईश्वराधना चालू ठेवावी, तसेच आळस झटकून प्राणायाम प्रत्याहार साधण्याचा प्रयत्न करावा. हळू हळू मन व बुद्धी आपल्याला साथ देतील असा प्रयत्न करणे सतत आवश्यक.

**कर्म फळाचे दान** – कर्म फळाचा लोभ न धरणे याला योग मार्गात विशेष प्रमुख स्थान आहे. समाज व्यष्टी व समष्टीने युक्त प्रत्येक मनुष्य कर्म करतो. त्याचे फळ त्याला वा समाजाला मिळते. व्यक्तीने कर्म फळ आपल्याकडेच ठेवले तर ते त्याजपाशी राहील. आपल्यापाशी ठेवले नाही तर समाजाकडेच जाईल. थोडक्यात कर्ता आपल्या कर्माचे फळ स्वतः भोगील अथवा त्याचा न्यास, दान, त्याग, अथवा अर्पण करील. गीता सांगते, व्यक्तीने कर्म तर करावे, कर्म फळाचा आश्रय करू नये. सर्वांच्या कल्याणासाठी कर्म फळाचे दान करावे. सर्वांच्या कल्याणात आपले कल्याण आहे. आज घडीला सर्वांच्या श्रमात व विज्ञान साधनेने उत्पादन वाढलेले आहे. पण वितरण व्यवस्था मूठभर लोकांच्या हाती राहिल्याने सर्व समाजातील घटकापर्यंत योग्य वितरण होत नाही. फल संग्रह वृत्तीमुळेच समाज असुखी आहे. उत्पादन प्रचंड प्रमाणात परंतु वितरण सर्वांपर्यंत नाही. यासाठी कर्मफल दान आवश्यक.

**सर्व संकल्प त्याग** – संकल्प त्यागावाचून फल त्याग होऊ शकत नाही. इथे भोग संकल्पच अधिक असतात. कर्म फलाच्या भोगासंबंधीचे सर्व विचार सोडून द्यावयास पाहिजे.

**द्वंद्व सहन** – योग साधनेत द्वंद्व सहन करण्याच्या शक्तीने मनुष्य निर्भय होतो.

**ज्ञान आणि विज्ञान** – योग साधनेत हेही आवश्यक. ज्ञानाचे स्वरूप प्रकाश, अज्ञानाचे स्वरूप अंधार. गीतेचा ज्ञानमार्ग आहे. यात अज्ञानी प्रगती करू शकत नाही.

**निर्भय व्हा** – भीतीचे काही कारण नाही. भीतीने मधेच साधन सोडले तर त्याची उन्नती थांबते म्हणून म्हटले आहे. निर्भय होऊन योगाभ्यास करावा. भित्र्या माणसाकडून साधना होणे शक्य नाही.

**खरी भक्ती** – सर्व भूतात वास्तव्य करणाऱ्या ईश्वराची एकत्वात स्थिर होणारा योगी भक्ती करतो. तो सदैव ईश्वरात राहतो. ही खरी श्रेष्ठ भक्ती. हिलाच पराभक्ती असे म्हणतात. सर्व भूतमात्रात एकाच आत्म्याची सत्ता आहे याचा प्रत्यक्ष अनुभव आल्यानंतरच ही भक्ती होणे संभवनीय आहे. तो पर्यंतची भक्ती ही गौण असते. योगिनां आणि सर्वेषां मद्गतेन अंतरात्मना। (६-४७) जो योगी अंतरात्मा माझ्या ठिकाणी ठेवून माझी उपासना करतो तो श्रेष्ठ योगी होय.

**योग गौरव** – केवळ शब्द ज्ञानापेक्षा योग जिज्ञासू श्रेष्ठ, तपस्वी शब्दज्ञानी कर्मीहून योगी श्रेष्ठ. जो कल्याण करतो त्याची दुर्गती होत नाही. योग मार्गाने जाणाऱ्या योग्याचा हा अधिकार आहे. म्हणून, इतर मार्गापेक्षा हा योग मार्ग श्रेष्ठ आहे. यात दुर्गति संभवत नाही. त्याचे योग साधन अपुरे राहून त्याला मृत्यू आला तरी त्यात त्याची हानी नाही. कारण पुढील जन्मात अपुरे साधन पुरे होऊन तो सिद्ध होते. एका जन्मात साधन पूर्ण झाले नाही म्हणून भिण्याचे काही कारण नाही; म्हणून इतर कोणत्याही मार्गापेक्षा योग मार्ग अत्यंत श्रेष्ठ आहे.

**कै. शं. बा. मठ**

●●●

## कॉम्पॅक्ट डिस्क (सीडी)

रेकॉर्ड दीर्घ काळ चालायची नाही आणि लवकर मोडायची, तर कॅसेट अडकून तुटायची. त्यामुळे संगीतप्रेमाचा विरस व्हायचा. जेम्स रसेल यांनी १९६५ मध्ये सीडीचा अभूतपूर्व शोध लावला. २२ पेटंट घेली. सीडीमध्ये डिजिटल स्टोअरेज करता यायचे आणि प्लॅस्टिकच्या तबकडीवर केवळ संगीतच नाही तर कॉम्प्युटर फाइल्स आणि छायाचित्रे मुद्रित करता यायची. सीडी लोकप्रिय होण्यास मात्र १५-१६ वर्षे लागली. फिलिप्स आणि सोनी कंपनीने रसेलकडून अधिकार विकत घेऊन १९८० मध्ये उत्पादन सुरू केले आणि कोट्यावधी सीडी खपू लागल्या.सध्या जगभर दर वर्षी २०० अब्जापेक्षा जास्त सीडींची विक्री होते.

**संग्रहातून**

## गुरूकिल्ली

आनंदी-उत्साही
असणं ही मनाची
एक अवस्था आहे.
ती सवयीने जोपासता
येते. नेहमी स्वतः
आनंदी-उत्साही
राहण्याचा संकल्प
करू या. आपल्या
सान्निध्यातील
वातावरण आनंदी
उत्साही राहील
यासाठी प्रयत्नशील
राहू या.

**संग्रहातून**

# साहित्य-जगत

**हरिभाऊ परांजपे यांचे आरती ग्रंथालया (ग्रंथालय गौरवगाथा)**

**<u>ग्रंथालय क्षेत्रातील सेवा</u>** हरी श्रीधर परांजपे (२०१, मनसुबा सोसा. ऑफ राम गणेश गडकरी रोड, ठाणे (प.)–४००६०२, फोन नं. ०२२–२५३९५०३८, मो. ९८६७७१६१५१) हे एक श्रेष्ठ माजी ग्रंथपाल आहेत. (ठाण्याच्या बेडेकर आर्ट कॉमर्स येथे ते ग्रंथपाल होते.) ग्रंथालय क्षेत्रात त्यांनी महनीय कामगिरी केलेली आहे. ती अशी आय. आय.टी. मुंबई विधीमंडळ, के. सी. लॉ कॉलेज येथे ते ग्रंथपाल होते. ठाण्याच्या मराठी ग्रंथसंग्रहालयात १० वर्षे कार्याध्यक्ष. ग्रंथपालन सर्टिफिकेट कोर्सचे १० वर्षे मुख्याध्यापक, ग्रंथालय चळवळीचे हाडाचे कार्यकर्ते सध्या ते अनेक पुस्तकांच्या प्रसारार्थ स्वतःच्या खिशातून पैसे खर्च करीत आहेत.

**ग्रंथ लेखन** – त्यांनी उत्तमोत्तम अशा ग्रंथांचे लेखन केलेले आहे. ही पुस्तके अशी १) सत्पुरुष भय्याजी कायंदे; चरित्र व विचार २) नेहरू विचार दर्शन : भाषणे प्रस्तावना, अनुवाद ३) मनाचे श्लोकःमनोवेधक मनन–चिंतन ४) समर्थ वाङ्मयः मनोवेधक आस्वाद ५) वारीचे मारुती (समर्थ स्थापित ११ मारुती (परिचय व पुस्तिका) ६) आरती ग्रंथालया (ग्रंथालय गौरवगाथा) (पृ.४४, मूल्य ४५/–)

**'आरती ग्रंथालया' चे अंतरंग**

हे छोटेखानी पुस्तक (अध्यक्ष, ठाणे जिल्हा ग्रंथालय संघ, ठाणे, द्वारा मराठी ग्रंथ संग्रहालय, सुभाष पथ, ठाणे –४००६०१) यांनी २५.१२.२०१० रोजी प्रकाशित केले आहे. भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांना हे पुस्तक अर्पण केलेले आहे. प्रसिद्ध साहित्यिक डॉ. अनंत देशमुख (५, शिल्पश्री, ब्राह्मण सोसा. नौपाडा, ठाणे (प.)–४००६०२, मो.९८२०८८७४०७) यांची सुंदर प्रस्तावना (एका संवेदनाशील ग्रंथपालाचे भावतरंग) लाभली आहे. ते म्हणतात, 'मुळात परांजपे यांचे मन संवेदनशील आहे. ग्रंथालयातील पदवी घेतल्यापासून वेळोवेळी त्यांचे काव्यलेखन चालू असायचे. ग्रंथ, ग्रंथालय, ग्रंथपाल, वाचक, सुसंस्कृत गाव, राष्ट्र यासंबंधीचे त्यांचे चिंतन काव्यरूप घेताना दिसते. परांजपे यांचा ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास या संतकवींचा आणि त्याबरोबरीनेच केशवसुतादी आधुनिक कवींचा अभ्यास चालू असायचा. पुस्तकांत एकूण ३० कविता आहेत. साऱ्या कवितांचा विषय, ग्रंथ, ग्रंथालये हाच आहे. ग्रंथालयाचे महत्व विशद करताना ते म्हणतात, 'ज्ञानाच्या ज्या शक्ती। विद्येच्या ज्या मूर्ती। साद घालताती ग्रंथालयी किंवा ग्रंथालय/स्थान विश्रांतीचे असे ते लिहितात. आपली बुद्धी, अभिरुची आणि व्यासंग विस्तारित व्हावा म्हणून ते ईश्वरापाशी 'ग्रंथसंग देई सदा' अशी विनंती करतात. ज्याने ग्रंीलयाचा आश्रय घेतला त्याचे स्वरूप 'अंतरि गेलिया अमृत। बाह्यकाया लखलखीत।' असे होते हे ते स्पष्ट करतात.

'आदर्श ग्रंथपाल' – ग्रंथालयाचे मोल ओळखून विविध महत्त्वपूर्ण ग्रंथांचे वाचन करण्याकरिता येणाऱ्या वाचकांच्या अपेक्षा पूर्ण होवोत हे सांगताना आणि येणाऱ्या वाचका/तुझा हिरमोड न व्हावा असे लिहितात. आदर्श ग्रंथपाल ग्रंथांची काळजी घेतो. ग्रंथालय अधिकाधिक वैशिष्ट्यपूर्ण ग्रंथांनी समृद्ध होईल हे तो पाहतो. तो सर्व प्रकारच्या वाचकांचा, अभ्यासकांचा साहाय्यकार, सखा नि मार्गदर्शक असतो. 'ग्रंथानंदे ज्याचे मन पोसले' असे मन त्याला लाभलेले असते. तो जिज्ञासू अभ्यासकांना त्यांच्या आवडीच्या विषयातील पुस्तके पुरवितो. सामान्य

---

हल्ली कमालीच्या स्पर्धेत माणसाला 'स्व' च्या पलिकडे काही अस्तित्व असते ही जाणीवच उरली नाही.

वाचकांना नवनवीन ग्रंथांची नावे सुचवितो. प्रत्यक्ष ग्रंथांचे संगोपन करण्यावर त्याचा कटाक्ष असतो.

### अप्रतिम पुस्तक

या पुस्तकातील प्रत्येक कविता सुंदर आहे. अर्थपूर्ण, विचार देणारी व प्रबोधन करणारी आहे. ग्रंथ, ग्रंथालयाचे विश्व, त्याचे पावित्र्य कसे जतन करावे हे सांगणारी आहे. 'Books are keys to wisdoms treasure' या हॉलबक जॅक्सन आणि History makes men wise या फ्रान्सिस बेकन यांच्या सुंदर कवितांचा अनुवाद त्यांनी केलेला आहे. पुस्तकातील प्रत्येक कविता वाचनीय तर आहेच शिवाय आपले जीवन समृद्ध कसे करून घ्यावे हे सांगणारी आहे. म्हणून प्रत्येकाने हे पुस्तक अवश्य वाचावेच व ग्रंथालयांनी संग्रही ठेवावे असे आवर्जून सांगावेसे वाटते. श्री. परांजपे यांना शतशः धन्यवाद. शेवटी त्यांच्या 'ग्रंथ संकीर्तन' व 'हेचि दान देगा देवा' या कविता उधृत करण्याचा मोह आवरत नाही. त्या अनुक्रमे अशा –

१) ग्रंथ घ्यावा ग्रंथ गावा। ग्रंथ जीवीचा विसावा।
कल्याणाचे जे कल्याण। ग्रंथालयांचे गुणगान।
मंगलाचे जे मंगल। ग्रंथ सरस्वतीचे मान।
ग्रंथ कैवल्याचा दानी। हरि त्याचा अभिमानी।।

२) हेचि दान देगा देवा। ग्रंथालयाचा विसर न व्हावा।
गुण गाईन आवडी। ग्रंथालय तेचि जोडी।
न लगे मुक्ति, धन, संपदा। ग्रंथ संग देई सदा।
'हरि' म्हणे गर्भवासी। सुखे घालावे आम्हासी।।

### 'सप्तसूर माझे' यशस्वी संगीतकार अशोक पत्की यांचे उत्कृष्ट आत्मकथन

श्रेष्ठ संगीतकार अरविंद घनःश्याम पाटकर (मनोविकास प्रकाशन, सदनिका क्र.३अ, चौथा मजला, शक्ती टॉवर्स, ६७२, नारायण पेठ, नू.म.वि. समोरील गल्ली, पुणे-४११०३०, फोन नं.०२०-६५२६२९५०) यांनी २५.८.२०१२ रोजी सर्व थरातील वाचकांना आवडेल असे एक सुंदर आत्मकथन (श्रेष्ठ संगीतकार अशोक पत्की यांचे) प्रसिद्ध केले आहे. (पृ.२९६ मूल्य रू.२३०/-) त्याबद्दल त्यांना प्रथमतःच धन्यवाद दिले पाहिजेत. भारतात संगीतकारांची मोठी प्रभावळ आहे. मराठीतल्या श्रीनिवास खळे, पं. जितेंद्र अभिषेकी, सुधीर फडके, दशरथ पुजारी, श्रीधर फडके, वसंत पवार, वसंत प्रभू, सी. रामचंद्र, यशवंत देव, इ. महान संगीतकारांच्या मांदियाळीत घराघरात पोचलेला श्रेष्ठ संगीतकार म्हणजे अशोक पत्की होय.

### अचाट कामगिरी

२५ ऑगस्ट १९४१ हा अशोक पत्कींचा जन्मदिवस. त्यांना शाळा, अभ्यास यांत बिलकूल रस नव्हता. सिनेमाचं भयंकर वेड. अरे सिनेमे काय बघतोस? भिकेची लक्षण सगळी! असा घरात ओरडा व्हायचा. त्यांचे काका खूप संतापी होते. त्यांच्या हातचा भरपूर मार त्यांनी खाल्ला. पण पत्की मात्र कुठल्याही विरोधाला न जुमानता, शाळेला दांड्या मारून सिनेमा पहावयाचे! 'आझाद, अनारकली, श्री ४२०, सी.आय.डी. आवारा, बरसात' असे कितीतरी चित्रपट त्यांनी अक्षरशः चाळीस चाळीस वेळा पाहिले. केवळ गाण्यांसाठी, संगीत ऐकण्यासाठी. धाकटी बहीण मीना हिला संगीताचे ज्ञान होते. ती गायिका होती. ती ऑर्केस्ट्रामधून गायची. तिला सोबत करण्यासाठी वडील व अशोक जायचे. नौशाद, कल्याणजी-आनंदजी, रोशन या मोठमोठ्या संगीतकारांची गाणी ती गात असे. वेगवेगळ्या स्टुडिओंतून जायची. अशी संधी मिळाल्यामुळे तेथील वातावरण, मोठमोठ्या संगीतकारांच्या चर्चा, तासनतास चालणारे ते भव्य ऑर्केस्टेशन, संगीत इ. सारे त्यांना पाहावयास मिळाले. ते त्यांनी कमालीचे आत्मसात केले. पेटी, ढोलक इ. वाद्ये ते वाजवू लागले. त्यांची स्मरणशक्ती एकदम तल्लख

आहे. ते एकपाठी आहेत. घरची परिस्थिती अत्यंत बेताची, प्रसंगी नुसता पाव खाऊनही दिवस लोटायचा! पण संगीत, सिनेमा यांच्या विलक्षण ओढीने त्यांनी प्रचंड कष्ट करीत पाहता पाहता असामान्य यश संपादन केले. त्यांच्या कर्तृत्वाकडे नजर टाकली तर आपल्याला स्तिमीतच व्हावे लागेल. गेल्या ५० वर्षात त्यांनी मिळविलेल्या घवघवीत यशाकडे पाहिल्यावर आपले डोळे दिपूनच जातील! शेकडो मराठी-कोकणी चित्रपटांचे संगीतकार, शेकडो नाटकांचे संगीत, शेकडो भावगीतांना दिलेल्या सुमधुर चाली, कित्येक अल्बम्स, नाट्यसंगीत, जिंगल्स, शीर्षक गीत असे वेगवेगळे संगीत प्रकार यशस्वीपणे हाताळून त्यांनी अचाट कामगिरी करून दाखविली आहे. त्यासाठी त्यांना महत्त्वाचे २०/२५ राष्ट्रीय व राज्य स्तरावरील पुरस्कारही मिळालेले आहेतच.

**मनोरंजक माहितीचा खजिना**

सिनेमा-नाटक-जाहिरात इ. क्षेत्रातील मनोरंजक, उद्‌बोधक माहिती, अनेक मजेदार किस्से (उदा. 'मोरूच्या मावशी'चे संगीत) हृदयस्पर्शी आठवणी (उदा. माहीमला नव्याने घेतलेलं घर) यांनी पुस्तक ओतप्रोत भरलेलं आहे. एकदा-दोनदा वाचून समाधान होत नाही. पुन्हा पुन्हा वाचावे असे वाटणारे हे पुस्तक कोणाही वाचकाला मोठा आनंद मिळवून देणारे आहे. संगीत-नाटक-सिनेमा या क्षेत्रात रस घेणाऱ्या मंडळीना तर हे पुस्तक वाचून मोठे समाधान होईल. आपल्या परिचित संस्था, ग्रंथालये, मंडळे यांना हे पुस्तक संग्रही ठेवण्याची शिफारस जरुर करावी.

**उत्कृष्ट पुस्तकनिर्मिती केल्याबद्दल धन्यवाद!**

प्रस्तावनाकार आनंद मोडक (संगीतकार) आपल्या प्रस्तावनेत म्हणतात. हे आत्मथन ज्यांनी शब्दबद्ध केलंय त्या नेहा वैशंपायन आणि स्नेहा अवसरीकीर यांनी त्यांच काम इतकं चोख बजावलं की, व्यक्तिशः स्वतः अशोकच आपल्याशी बोलतोय असं वाटत रहात. या कामगिरीबद्दल त्यांचे प्रकाश अरविंद पाटकर आणि खुद्द लेखक संगीतकार अशोक गोविंद पत्की यांचे मनःपूर्वक आभार. आनंद मोडक पुढे म्हणतात, 'गाणाऱ्या धाकट्या बहिणीच्या कार्यक्रमात तिच्या सोबत म्हणून जाता जाता हार्मोनियम आणि ढोलक वादनात प्रावीण्य तर अशोकनं मिळवलंच पण हिंदी चित्रपट सृष्टीतील ख्यातनाम गायिका सुमन कल्याणपूर यांच्या जलशापासून ते पंचमदा अर्थात आर. डी. बर्मन या युग प्रवर्तक प्रतिभावंत संगीतकारापर्यंत आणि मराठी संगीत रंगभूमीला नव संजीवन देणाऱ्या प. जितेंद्र अभिषेकींपासून जाहिरात-संगीत क्षेत्रातल्या श्री. वैद्यनाथन, श्री. सुरेश कुमार आणि वनराज भाटिया या संगीतकारांच्या संगीत आविष्कारात अशोकनं अनमोल योगदान दिलं.

'आपल्या वैभवशाली संगीताचा वारसा जोपासत नव्या, दमदार पिढीलाही आपल्या स्वरसाम्राज्यात सहभागी करून घेतलं. सकारात्मक दृष्टिकोन आणि माणूसधर्म उपजतच घेऊन आलेल्या या स्वर रचनाकाराचे हे सप्तसूर'

**श्री. शरद जोशी (ग्रंथ प्रसारक)**
५, अमर कल्पतरू सोसायटी,
देवी चौक, शास्त्रीनगर,
डोंबिवली - ४२१२०२
दूरध्वनी : ९५२५१२-४८६९६७

●●●



# प्रार्थना

*प्रार्थनेचे महत्त्व विशद करणारा लेख - संपादक*

'योगी श्री अरविदांनी त्यांच्या 'सावित्री' या महाकाव्यात एका ठिकाणी म्हंटलय की एखादी मन:पूर्वक केलेली प्रार्थना, एखादे परिणामकारक ठरणारे कृत्य अथवा एखादी नामी कल्पना यामुळे माणसातील शक्ती वैश्विक शक्तीशी जोडली जाते. आणि मग त्यातून एखादा चमत्कार सहज घडून येऊ शकतो. प्रार्थनेचा मुख्य विषय थोडा बाजूला ठेवून आपण दुसऱ्या दोन मुद्याकडे प्रथम वळू.

गेल्या १०० वर्षांतील दोन परिणामकारक कृत्ये आपल्या नजरेसमोर येतात. ब्रिटिशांनी केलेला मिठाचा कायदा धुडकावून लावण्यासाठी गांधीजींनी केलेला सत्याग्रह. गांधीजींनी मीठागरातलं एक चिमूटभर मीठ उचललं पण त्या एका प्रतीकात्मक कृत्याने ब्रिटिश साम्राज्य हादरलं. त्याचप्रमाणे बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या शेकडो अनुयायांसमवेत महाडच्या चवदार तळ्यातील पाण्याचा घोट घेतला तेव्हा साऱ्या दलित समाजाला आता आपण मुक्त झालो असं वाटलं. या दोन्ही कृत्यांमुळे महात्मा गांधी आणि बाबासाहेब आंबेडकर यांना फार मोठं सामर्थ्य प्राप्त झालं.

एखादी नामी कल्पना कोणती तर गांधीजीची नि:शस्त्र प्रतिकाराची, शांततामय असहकाराची, सत्याग्रहाची सामान्यातला सामान्य माणूस याच कल्पनेच्या जोरावर ब्रिटिशांच्या पाशवी सत्तेला आव्हान देऊ शकला. हातात एक शस्त्रही न घेता निधड्या छातीनं ब्रिटीशांच्या बंदुकांना सामोरा जाऊ शकला.

प्रार्थनेच्या बाबत मात्र परिस्थिती थोडी वेगळी आहे. वैयक्तिक जीवनात प्रार्थनेमुळे माणसाला फार मोठं बळ मिळतं आणि त्याच्या जोरावर अनेकांनी आपापल्या संकटांवर मात केल्याच्या गोष्टी आपण ऐकतो. सामूहिक जीवनांतही सामूहिक प्रार्थनेमुळे अशा गोष्टी घडू शकतात. मात्र प्रार्थनेच्या बाबत तो दृश्य परिणाम हा प्रार्थनेमुळेच घडून आला, अशी श्रद्धा आपल्या मनांत निर्माण व्हावी लागते. ''मूकं करोति वाचालं, पंगुम् लंघयते गिरीम्।'' या वचनावर आपली मनोमन श्रद्धा बसावी लागते. मात्र जरी अशी श्रद्धा बसली तरी जिज्ञासेपोटी एक प्रश्न मनात येतोच की प्रार्थनेच्या योगे हे इप्सित साध्य होण्याची प्रक्रिया कशी काय घडून येते?

अशा प्रकारच्या प्रश्नांना योगी श्री अरविंदांनी जी उत्तरे दिली आहेत, त्यावरून आपणास समजते की, विश्वामध्ये एक संकल्पशक्ती कार्यरत आहे. ती यांत्रिक पद्धतीने कार्य करणारी नसून दिव्य, जाणीवयुक्त आहे. सर्व कर्म आणि वैयक्तिक कर्माची सर्व चक्रे याच महान संकल्पशक्तीच्या कार्याचा भाग आहेत. ती एक गतिशील चैतन्यमयी शक्ती तिची कार्ये पूर्वनियोजित नसतात. ध्यान, प्रार्थना या सारख्या मार्गानी त्या शक्तीशी संबंध जोडणे, तिला आवाहन करणे शक्य असते. थोडक्यात, मानवी संकल्पशक्ती या ना त्या पद्धतीने त्या महान शक्तीशी जोडता येते. त्या महान संकल्पशक्तीचा जो प्रतिसाद मिळतो त्यासच आपण कृपा म्हणतो. आणि या कृपेनेच प्रार्थनेचे इप्सित साध्य होते.

परंतु हे गणित नेहमीच जमते असे नाही. त्या संकल्पशक्तीच्या कार्याच्या काही ढोबळ दिशा व उद्दिष्टे ठरलेली असतात. माणसाने इच्छिलेल्या गोष्टी जेव्हा त्या

छोट्या दुःखांना शब्द सापडतात, मोठी दुःख अबोल असतात.

महान उद्दिष्टाशी जुळत नाहीत तेव्हा ती अपेक्षित कृपा होत नाही. पण प्रार्थना असफल होते म्हणजे नक्की काय होते ते समजून घेण्यासाठी एका छोट्या मुलीची गोष्ट पाहू.

एक छोटी मुलगी रात्री झोपताना प्रार्थना करत होती. ''देवा, माझी बाहुली तुटली आहे. ती दुरुस्त करुन दे''

तिचा मोठा भाऊ जवळ उभा राहून ऐकत होता. तो तिला म्हणाला – ''वेडी कुठली, देव कधी असल्या वेडगळ प्रार्थना ऐकतो का?''

''हो, माझी प्रार्थना तो नक्की ऐकेल'' ती म्हणाली आणि नंतर झोपी गेली. सकाळी उठल्यावर तिचा भाऊ तिला म्हणाला – ''काय गं, देवाने ऐकली का तुझी प्रार्थना? झाली का तुझी बाहुली दुरुस्त?''

ती मुलगी म्हणाली – ''हो, ऐकली ना माझी प्रार्थना. म्हणजे त्याने मला सांगितलं की मी आता मोठी झाले आहे. आता बाहुलीशी नाही खेळायचं.''

या कथेचे तात्पर्य हे आहे की, आपली प्रार्थना परिपक्व असते आणि परमेश्वरावर पूर्ण श्रद्धा असते तेव्हा अंत:करणपूर्वक केलेल्या प्रार्थनेने इप्सित साध्य होते मात्र जेव्हा इप्सित साध्य होत नाही तेव्हा अन्य मार्गाचे दर्शन होते. माणूस निराश होत नाही.

योगी श्री अरविंदानी सांगितल्याप्रमाणे प्रार्थनेचे सामर्थ्य आपणास समजले. प्रार्थनेपासून फलप्राप्ती झाली अथवा न झाली तर काय घडते तेही पाहिले. पण आता प्रश्न निर्माण होतो की मुळात प्रार्थना कशी करावी, कधी करावी, किती वेळा करावी आणि सर्वांत महत्वाचे म्हणजे कशासाठी करावी किंवा काय मागावे ?

मुळात प्रार्थना म्हणजे मागणे किंवा याचना करणे. मानवाची आपल्या जीवनात काही तरी करण्याची धडपड चालू असते. त्यात तो कधी जिंकतो तर कधी हरतो. आपल्या सामर्थ्याला आणि बुद्धिमत्तेला मर्यादा असल्यामुळे आपले प्रयत्न तोकडे पडतात याची त्यास जाणीव होते आणि यातूनच तो सर्वशक्तिमान परमेश्वराला शरण जाऊन त्याची प्रार्थना करतो, मदतीची याचना करतो आणि म्हणून प्रार्थनेमध्ये जेव्हढी सरलता असेल, सहजता असेल, हृदयातून निघणारा भाव साध्यासुध्या शब्दांत व्यक्त केला असेल, तर ती प्रार्थना श्रेष्ठ ठरते आणि भगवंतापर्यंत पोहोचते. वेद–उपनिषद पुराणे यांतील अनेक स्तोत्रे या वस्तुतः अधिकारी पुरुषांनी केलेल्या थोर प्रार्थना आहेत. ती स्तोत्रे म्हणताना मूळ रचयित्याच्या मनातील भाव आपण आपल्या मनात निर्माण करून ती स्तोत्रे म्हटली, तरच त्यापासून खरा फायदा होतो अन्यथा ते म्हणणे म्हणजे कोरडे कर्मकांड होते.

आता प्रार्थना कधी करावी? सर्वसाधारणपणे अनेक जण अडचणींत सापडले, संकटात सापडले की त्यांना परमेश्वराची आठवण होते व ते प्रार्थना करतात. त्यांची प्रार्थना अंतःकरणपूर्वक असेल, भावयुक्त असेल तर भगवंत त्यांनाही प्रतिसाद दिल्याशिवाय राहत नाही. परंतु नेहमीची सवय नसेल तर अनेकांना अशा प्रसंगीही भगवंताची आठवण होत नाही. प्रार्थना करणे तर दूर राहिले आणि म्हणून भगवंताचे नित्य स्मरण ठेवणे आवश्यक ठरते व त्यासाठी किमान २ वेळा तरी प्रार्थना करावी असे म्हटले जाते. **पहिली प्रार्थना** अर्थातच पहाटे उठल्याबरोबर करावी. ही वेळ अतिशय शांत असते. त्यावेळी आपले मनही स्वच्छ असते. बाहेरचे कोणतेही विचार आंत येण्यास अवसर मिळालेला नसतो. आणि त्यामुळे परमेश्वराला स्वच्छ व शांत मनाने साद घालता येते. त्याच्याशी सुसंवाद साधता येतो. जीवनातील आणखी एक अंधारी रात्र मागे सारून त्याने आपल्याला आणखी एका प्रकाशमय दिवसाकडे नेणारा उषःकाल दाखवला म्हणून त्याचे आभार मानावे. येणाऱ्या नवदिवशी योग्य ते कार्य करण्यासाठी शारीरिक, मानसिक व बौद्धिक सामर्थ्य देण्याची प्रार्थना करावी. **दुसरी प्रार्थना** ही झोपण्यापूर्वी

करावी. या प्रार्थनेचे स्वरूप काहीसे वेगळे असते. दिवसभर घडलेल्या घटना, भेटलेली मंडळी, त्यांच्याशी झालेला सुसंवाद यावर एक नजर टाकावी. आपण कसे वागलो त्याचे निरीक्षण करावे. काही चुकले असे वाटले तर परमेश्वराकडे क्षमा याचना करून तशी चूक पून्हा होणार नाही याची काळजी घेण्याचा निश्चय करावा. यानंतर शांत झोप लागावी आणि उठल्यावर आपल्या शरीरातील सर्व पेशी ताज्यातवान्या होऊन कार्य करण्यास सक्षम होतील असे करावे, म्हणून प्रार्थना करावी.

यानंतर महत्वाचा प्रश्न म्हणजे प्रार्थना कशासाठी करावी? काही धर्मांत प्रार्थना हेच उपासनेचे एक महत्वाचे अंग मानले आहे. हिंदु धर्माच्या अध्यात्मिकतेमध्ये अनेक मार्ग शास्त्रशुद्ध पायावर विकसित झाले आहेत आणि तरीही परमेश्वराला साद घालण्यासाठी प्रार्थनेचे महत्त्व कायम आहे. प्रत्येक माणूस हा जाणीवेच्या वेगवेगळ्या स्तरावर असतो. प्रत्येकाचा पिंड वेगळा असतो. आणि त्यामुळे प्रत्येकाची गरज वेगळी, तशी प्रार्थनाही वेगळी असू शकते. भगवंताने भक्ताचे ४ प्रकार सांगितले आहेत. आर्त, अर्थार्थी, जिज्ञासू आणि ज्ञानी भक्त आतापर्यंत आपण जो विचार केला तो आर्त भक्तांचा, जे दुःखी कष्टी आहेत, जे संकटात सापडले आहेत ते भक्त संकटातून सोडवण्यासाठी परमेश्वराचा धावा करतात. अर्थार्थी म्हणजे ज्यांना भौतिक संपत्ती प्राप्त होण्याची इच्छा आहे. असे भक्त परमेश्वराची केवळ अशा गोष्टींची प्राप्ती व्हावी म्हणून प्रार्थना करतात. जिज्ञासूना परमेश्वराला त्याच्या सामर्थ्याला जाणून घ्यायचं असतं तर ते ज्ञान प्राप्त व्हावं म्हणून ते तळमळीने प्रार्थना करतात. सर्वश्रेष्ठ अशा ज्ञानी भक्तांची प्रार्थना मात्र जगाच्या कल्याणासाठी असते. आपल्या ऋषीमुनींनी केलेली सार्वत्रिक सुखाची प्रार्थना –

सर्वेत्र सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयः
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित् दुःखमाप्नुयात।

भक्तश्रेष्ठ तुकाराम बुवा यांना तर जन्मजन्मांतरी परमेश्वर भक्तीच्या गोडव्यात दंग राहण्याची आस होती आणि म्हणून ते आपल्या प्रार्थनेत म्हणतात–

हेचि दान दे गा देवा, तुझा विसर न व्हावा
न लगे मुक्ती आणि संपदा, संतसंग देई सदा।।

त्यांना जशी भौतिक संपत्ती नको होती तशीच मुक्तीही नको होती. पुन्हा पुन्हा जन्म घेऊन संताच्या सहवासात राहून परमेश्वर भक्ती करावयास मिळावी अशी प्रार्थना ते करताहेत. आणि यानंतर ज्ञानीयांचा राजा ज्ञानेश्वर यांची प्रार्थना म्हणजे त्यांनी मागितलेले ‘पसायदान’ म्हणजे विश्व कल्याणाची प्रार्थना आहे. या जगात जे कोणी दुष्ट आहेत त्यांचा दृष्टपणा नाहीसा होवो, त्यांच्या हातून सत्कर्म घडो व सर्व मानवी समाजात एकमेकांविषयी प्रेमभाव निर्माण होवो. ज्याला जे इच्छित आहे त्याला ते प्राप्त होवो अशी ही विश्व कल्याणासाठी केलेली थोर प्रार्थना.

श्री अरविंद आश्रमाच्या माताजी प्रार्थनेस विशेष महत्त्व देत असत. त्यांची प्रार्थना ही पूर्णतः आध्यात्मिक परिवर्तन घडून येण्यासाठी केलेली प्रार्थना होती. ऋषीमुनींपासून साधूसंतांपर्यंत सर्वांना अपेक्षित असणारं मानवी समाजाचं कल्याण जर प्रत्यक्षात यायचं असेल तर त्यासाठी मानवाचा Conciousness वरच्या स्तरावर जायला हवा, मानवाची Integral Development व्हायला हवी. त्यासाठी प्रत्येक व्यक्तीने परमेश्वराकडे काय मागावे?

‘‘ माझी समजशक्ती मर्यादित असेल तर ती विशाल कर,
माझे ज्ञान संदिग्ध असेल तर ते उज्वलित कर,
माझे हृदय उत्कटतारहित असेल तर ते प्रज्वलित कर,
माझे प्रेम सामान्य असेल तर ते तीव्र होऊ दे,
माझ्या भावना अज्ञानी आणि अहंकारी असतील तर
त्यांना सत्याच्या ठिकाणी संपूर्ण जागृत कर.’’

परंतु ही झाली व्यक्तिगत पातळीवरील वैयक्तिक

माणूस सत्तेवर आला की त्याचा खरा स्वभाव प्रकट होतो.

पूर्णत्वासाठी केलेली प्रार्थना. श्री अरविंद आणि माताजी यांच्या विचारधारेप्रमाणे परमेश्वर किंवा प्रकृती हे मानवी समाजाला हळू हळू पूर्णावस्थेकडे नेत आहेत. या पृथ्वीतलावर दैवी जीवन निर्माण व्हावे, सत्ययुग अवतरावे ही परमेश्वराची इच्छा आहे, असे ते मानत आणि म्हणून त्या विचारांशी जुळणारी प्रार्थना करताना माताजी म्हणतात–

'' हे भगवन् असे वरदान दे की आमच्यामधील कोणतीही गोष्ट तुझ्या कार्यात बाधक होणार नाही; असे वरदान दे की, कोणतीही गोष्ट तुझ्या आविष्कारास विलंब होऊ देणार नाही; असे वरदान दे की सर्व घटनांमध्ये आणि प्रत्येक क्षणी तुझीच इच्छा कार्यान्वित केली जाईल, असे वरदान दे की आमच्यातील प्रत्येक गोष्ट तुझ्या कार्यामध्ये सहकार्य देईल.'' असो. तेव्हा अशा रीतीने प्राचीन ऋषीमुनींपासून आज पर्यंतच्या अनेक थोर संतांनी, योग्यांनी प्रार्थना कशी केली, कशासाठी केली ते आपण पाहिले परंतु आपल्यासारख्या सर्वसामान्यांनी रोज प्रार्थना करावी असे म्हटले जाते ते कशासाठी? महात्मा गांधी प्रार्थनेस मनाचा खुराक म्हणत असत. आपण शरीराला दोन वेळा जेवण, एकदा नाश्ता आणि अधून मधून चहा कॉफी देत असतो. पण मनाला काय देणार? प्रार्थना हा मनाचा खुराक आहे, पौष्टिक आहार आहे. प्रार्थनेमुळे मन निर्मळ होते, खंबीर होते आणि नम्रही होते.

वैयक्तिक प्राथने इतकेच सामूहिक प्रार्थनेलाही महत्त्व आहे. सामूहिक प्रार्थनेमुळे प्रार्थना करणाऱ्या सर्वांची मने जुळतात, त्यांच्यात एकता निर्माण होते. आणि म्हणून काही कुटुंबांत सायंकाळी सर्वांनी एकत्र प्रार्थना करण्याची पद्धत आहे इंग्रजीत एक म्हण आहे – The Family that prays together, stays together.

प्रार्थनेच्या वैयक्तिक आणि सामूहिक पातळीवरील सर्व प्रकारच्या संकल्पना आपण पहिल्या तरीही त्या सर्व परमेश्वराकडे द्वैत रूपाने काहीतरी मागण्यासाठी अथवा त्याच्या कृपाप्रसादाची याचना करण्यासाठी होत्या. त्यापेक्षा उदात्त ठरणारं अस प्रार्थनेचं स्वरुप आपणास आता पहावयाच आहे. आणि तेही कविवर्य कै. बा. भ. बोरकर यांच्या 'प्रार्थना' या कवितेतून व्यक्त झालेलं. बोरकरांना सर्वसामान्य लोक ओळखतात, ते एक प्रेमकवी आणि निसर्गकवी म्हणून, परंतु बा. भ. बोरकर हे एक अध्यात्मिक व्यक्तिमत्त्व होतं. त्यांच्या अनेक आध्यात्मिक काव्यरचनांतून त्यांनी कोणती उंची गाठली होती, ते समजू शकतं. अशीच 'प्रार्थना' ही एक काव्यरचना.

या कवितेत बोरकर प्रार्थनेची तुलना कवितेशी करतात. म्हणजे कवितेप्रमाणे प्रार्थनासुद्धा अंतर्यामातून स्फुरलेली असावी, स्पंदशील असावी, शब्दांच्या शिल्पात बद्ध न झालेली असावी. थोडक्यात, ती भावप्रधान असावी आणि अशी ही प्रार्थना जेव्हा झाडासारखी उगवते आणि असीम उर्ध्वाचा शोध घेण्यासाठी प्राणांचे बीज भेदीत चढत राहते तेव्हा माणसाचं उन्नयन होतं, त्याचा अवधूत अश्वत्थ होतो. तो आपल्या संचिताचा शोध घेतो. आणि अशा या उपासनेचा जेव्हा शेवट होतो तेव्हा त्या प्रार्थनेलाच स्वयंपूर्तता प्राप्त होते. प्रार्थनेचाच प्रसाद होतो असे ते म्हणतात.

साधूसंत आणि योगी–महात्मे यांच्या प्रार्थनेचा हा प्रत्ययानुभव आहे. त्या थोर विभूतींच्या अनुभूतीशी जवळीक साधून प्रार्थना उत्क्रान्त होत शेवटी कुठे पोहोचते त्याचे दर्शन बोरकरांनी या रचनेतून घडवले आहे.

**श्री. नरेन्द्र नाडकर्णी**
सीडी. १०१, सी. १,
श्रीरंग सोसायटी, ठाणे.
दूरध्वनी – २५३३३१६०
E mail : nd_nadkarni@yahoo.com

●●●

# गुरूवर्य एस. व्ही. आणि माध्यमिक शिक्षणोत्तर विद्यार्थी संघ

*एस. व्हीं. च्या आठवणी सांगणाऱ्या तीन ते चार पिढ्या ठाण्यात आहेत. त्यांतील श्री. मथुरे यांनी सांगितलेली ही आठवण - संपादक*

जवळ जवळ ६० वर्षांपूर्वीची गोष्ट. आपलं ठाणे शहर म्हणजे त्यावेळेस एक छोटंस, मागासलेलं शहर होतं. शहराची लोकवस्ती जेमतेम ६०/७० हजार एवढीच होती. नौपाड्याच्या भागात वेगळी ग्रामपंचायत होती. शहरात फारतर ४/५ शाळा होत्या. मॅट्रिक पास झाल्यावर ठाण्यातील मुलांना माटुंग्याची रुईया आणि पोद्दार ही सर्वात जवळची कॉलेजं होती. हॉटेलमध्ये जाऊन खाण्याची पद्धत नव्हती आणि अनेकांना ते परवडतही नसे. साहजिक कॉलेजचे तास संपले की गाडी पकडून केव्हा एकदा घरी जातो असे होत असे. पण त्यामुळे कॉलेजच्या लायब्ररीत बसून अभ्यास करता येत नसे. कॉलेजमध्ये चालणाऱ्या निरनिराळ्या कार्यक्रमांत, खेळात भाग घेणे किंवा ते नुसते पहायला जाणे केवळ अशक्य होत असे. पण यामुळे ठाण्यात राहणाऱ्या मुलांच्या सर्वांगीण प्रगतीला खीळ बसत होती. त्यांच्यातील गुणांना पुरेसा वाव मिळत नव्हता. आणि त्यामुळे होणाऱ्या मानसिक कुचंबणेची सल त्यांच्या मनात सतत डाचत राही. एकमेकांना भेटलो की याच भावना व्यक्त होत असत.



**एस.व्ही. कुलकर्णी**

त्याकाळी ठाणे शहरातील फिरण्याचे मुख्य ठिकाण म्हणजे सेन्ट्रल मैदान. आणि तिथेही आमचा अड्डा बसायचा तो जेलच्या मारुतीच्या देवळामागील तळ्यावर. असेच एकदा आम्ही बसलो असताना दत्ता लोहोकरे मला म्हणाला, ''अरे आपल्या हल्ली भेटीगाठी पण होत नाहीत. आपण एखादा क्लब तरी काढू या.'' तेव्हां मी त्याला म्हटलं-''त्यापेक्षा एखादी संस्थाच काढू या'' आणि मग हा विचार मनात येताच आम्ही तडक एस्.व्हीं.कडे गेलो.

आमची शाळा जरी सुटली असली तरी एस्.व्हीं.शी असणारे बंध मात्र कायम होते. एस. व्ही. कुलकर्णी सरांच घर म्हणजे आम्हा विद्यार्थ्यांच गुरुकुल होतं. आम्ही सारा विषय सरांसमोर मांडला सरांनी ताबडतोब दत्ताला सांगितलं की हेमाची कल्पना उत्तम आहे आणि मग सरांच्या आशीर्वादानं आणि त्यांच्याच मार्गदर्शनाखाली ''माध्यमिक शिक्षणोत्तर विद्यार्थी संघ'' या विद्यार्थ्यांनी , विद्यार्थ्यांसाठी चालविल्या जाणाऱ्या विद्यार्थी संघटनेची स्थापना २१ डिसेंबर १९५२ रोजी कै. मो. वा. दोंदे यांचे हस्ते झाली.

आमच्या बहुतेक कार्यक्रमासाठी आम्ही एस्.व्हीं.च मार्गदर्शन घेत होतो. पण तरीही त्यांनी आम्हांला ठाणे शहरातील सर्वच ज्येष्ठांचे अणि श्रेष्ठांचे आशीर्वाद आणि मार्गदर्शन घेण्याचे सुचविले व त्यानुसार एक सल्लागार समिती निर्माण झाली. कै. माधवराव हेगडे अध्यक्ष झाले. आणि समितीत एस.व्ही. कुलकर्णी, के. बी. जोशी, दत्ताजी ताम्हणे, मुकुंदराव आगासकर, स. पां. जोशी इत्यादी मान्यवर होते.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून

आम्ही दरवर्षी दिवाळीच्या सुट्टीत प्रदर्शन भरवत असू. त्यातील विशेषतः शास्त्र विभाग ठाणे शहरात खूप प्रसिद्धी पावला होता. सर्व क्षेत्रांतील ज्येष्ठांचे विचार विद्यार्थ्यांना ऐकावयास मिळावे म्हणून हेमंत व्याख्यानमाला आयोजित करण्यात येत असे. बॅ. नाथ पै, एस्. एम. जोशी , ना. ग. गोरे, काकासाहेब गाडगीळ, पु. भा. भावे, द. वा. पोतदार, बॅ. चारी इत्यादी अनेक थोर विचारवंत संस्थेच्या व्यासपीठावर येऊन गेले. याशिवाय अनेक नामवंत प्राध्यापकांच्या सहाय्यामुळे कॉलेज विद्यार्थ्यांसाठी अभ्यास मंडळे आयोजित करण्यात आली. हे सर्व आम्ही करू शकलो त्याच एकमेव कारण म्हणजे एस. व्ही. कुलकर्णींचा आम्हाला खंबीर पाठिंबा होता व त्यामुळे हे सर्व कार्यक्रम करण्यासाठी आम्हाला मो. ह. विद्यालयाची जागा उपलब्ध होती.

१९६० सालची गोष्ट. ठाण्यात मराठी साहित्य संमेलन होणार म्हणून जाहीर झाले होते. त्यानिमित्त विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे भव्य प्रदर्शन भरवावे असे आम्हांस वाटले. आम्ही कुलकर्णी सरांना आणि शाळेचे मुख्याध्यापक थोरात सर यांना भेटलो, आमची इच्छा सांगितली. त्यांनीही मोठ्या आनंदाने मो. ह. विद्यालयाचा संपूर्ण तळमजला प्रदर्शनासाठी देण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर काही दिवसांनी संमेलनाचे आयोजन करणारी ठाण्यातील काही प्रमुख मंडळी थोरात सरांना भेटली व शाळेची जागा संमेलनासाठी येणाऱ्या प्रतिनिधींना राहण्यासाठी द्यावी अशी विनंती केली. पण थोरात सरांनी त्यांना स्पष्ट सांगितलं की आम्ही मुलांना शब्द दिला आहे. त्यानंतर त्या संयोजकांनी प्रदर्शन अन्यत्र नेण्यासाठी आमच्यावर आणि शाळेच्या व्यवस्थापनावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला. पण दोन्ही सर आमच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. शेवटी प्रदर्शन मो. ह. विद्यालयातच भरवले गेले. प्रदर्शनाचे उद्घाटन पंजाबचे राज्यपाल काकासाहेब गाडगीळ यांचे हस्ते झाले. अनेक साहित्यिकांनी प्रदर्शनास भेट दिली व मुलांचे कौतुक केले.

असाच एक प्रसंग. पण तो काहीसा अंगलट आलेला, हेमंत व्याख्यानमालेत आम्ही महादेव शास्त्री जोशी यांचे व्याख्यान ठरवले होते. व्याख्यानाच्या २ दिवस आधी सुधाताई जोशींना गोवा-मुक्ती संग्रामात गोव्यात अटक झाल्याचे वृत्त आले. ते वृत्त समजताच महादेव शास्त्री तातडीने गोव्यास रवाना झाले. आयत्यावेळी त्यांच्या तोडीचा दुसरा वक्ता मिळेना. आमची धावाधाव सुरू होती. एवढ्यात आम्हाला कुणीतरी सांगितलं की शांता आपटे येऊ शकतील. कार्यक्रम ठरविण्यासाठी मी व नाना करंदीकर गेलो. बाई त्यावेळेस कुर्ला स्टेशनच्या जवळपास राहत होत्या. आम्ही रात्री ८ वाजत त्यांच्या घरी पोहोचलो. जवळ जवळ ३ तास आम्ही त्यांची वाट बघत बाहेर बसलो होतो. रात्री ११ च्या सुमारास बाई बाहेर आल्या. आम्हांला भेटल्या आणि त्यानंतर जवळ जवळ २ तास आमच्याशी बोलत होत्या. शेवटी कार्यक्रमास येण्याविषयी होकार घेऊन मोठ्या आनंदाने आम्ही कुर्ला स्टेशनवर आलो तर शेवटची गाडी नुकतीच गेली होती. आणि त्यामुळे पहाटे ४ वाजेपर्यंत मी व नाना कुर्ला स्टेशनवर बसून राहिलो. दुसऱ्या दिवशी सकाळीच मो. ह. विद्यालयाच्या बाहेरील गेटवर एक बोर्ड टांगून कार्यक्रमात बदल झाल्याचे जाहीर करण्याचा प्रयत्न केला. कार्यक्रमास बऱ्यापैकी गर्दी झाली. त्यातील निम्मी गर्दी होती ती महादेव शास्त्रींचे विचार ऐकण्यासाठी आलेल्या ज्येष्ठांची. आणि उरलेली गर्दी होती ही ज्यांना बदल कळला होता अशा बाईंच गाणं ऐकण्याची इच्छा असलेल्या रसिकांची. पण बाईंनी त्यादिवशी आपल्या कला प्रवासावर एक व्याख्यान ठोकलं. एकही गाणं म्हणून दाखवलं नाही. त्यामुळे त्यांच्या रसिकांची निराशा झाली. महादेव शास्त्रींचे विचार ऐकण्यासाठी आलेल्या ज्येष्ठांची तर घोर निराशा झाली होती. त्यापैकी काही जणांनी तर आमच्या सल्लागार मंडळीकडे तक्रारीचा सूर आळवला.

गैरमार्गाने कमावलेला पैसा समृद्धी देतो, समाधान नाही.

त्यामुळे त्यांनी आम्हाला चांगलंच फैलावर घेतलं गेलं. पण याही खेपेस सर आमच्या मदतीस धावून आले. ''मुलांचा कसा नाईलाज झाला होता व त्यामुळे असा बदल केला गेला. तोही कुणाच्या तरी सांगण्यामुळे व त्यामुळे काही चुका झाल्या. मुलं हळू हळू शिकताहेत. अशा चुका पुन्हा करणार नाहीत.'' असे सरांनी सांगताच वातावरण निवळले. आम्ही सहीसलामत सुटलो आणि पुन्हा जोमाने कामास लागलो.

१९५२ ते १९६५ हा संस्थेच्या इतिहासातील पायाभरणीचा काळ होता. या काळात उत्तम पायाभरणी झाली. संस्था केवळ टिकून राहिली नाही तर तिची जोमाने वाढ झाली ती केवळ एस्‌.व्हींच्या भरभक्कम आधाराच्या जोरावर. १९५२ साली लावलेल्या एका छोट्या रोपट्याचा आज डेरेदार वृक्ष झाला आहे. संस्थेने सुरू केलेली 'आल्मेडा लायब्ररी' ही वर्षाचे ३६५ दिवस २४ तास खुली असणारी पहिली लायब्ररी. गेल्या ४० वर्षांत हजारो विद्यार्थ्यांनी या लायब्ररीचा लाभ घेतला.

माध्यमिक शिक्षणोत्तर विद्यार्थी संघाच्या स्थापनेत मी, दत्ता लोहोकरे, श्रीकांत खळे, नाना करंदीकर, यशवंत साने, श्रीधर आठवले आणि प्रल्हाद गांगल इत्यादी मो. ह. विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा प्रामुख्याने सहभाग असला तरी ही संस्था ठाणे शहरातील एस्‌.एस्‌.सी. पास झालेल्या सर्व विद्यार्थ्यांची होती. साहजिकच, इतर शाळांमधून पास झालेल्या मुकुंद दामले, केशव भावे इत्यादिकांचाही संस्थेच्या कार्यात सहभाग सुरू झाला. त्यांचेही एस्‌.व्हीं.शी संबंध निर्माण झाले. आणि सरांनी जसं आमच्यावर प्रेम केलं तसंच या इतरांवरही केलं. मुकुंदाचं वक्तृत्व, इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व, शिक्षणक्षेत्राविषयी असणारी ओढ आणि समाजासाठी काहीतरी करण्याची कळकळ हे सारं सरांनी जाणल होतं आणि म्हणूनच तो बी. जे. हायस्कूलचा माजी विद्यार्थी असूनही सरांनी जनरल एज्युकेशन इन्स्टिटयूटच्या कार्यकारिणीसाठी त्याच्या नावाची शिफारस केली. अनेक वर्षे तेथे निरलसपणे काम करून मुकुंदा जेव्हा इन्स्टिट्यूटचा चेअरमन झाला तेव्हां एस्‌.व्हीं.ना झालेला आनंद अवर्णनीय होता. मुकुंदालाही एस्‌.व्हीं.बद्दल इतका आदर होता की एकदा कुणाला तरी त्याचा सत्कार करायचा होता. तेव्हां मुकुंदा म्हणाला, ''मला सत्कार नको आहे पण करणारंच असलात तर फक्त एस्‌.व्हीं.च्या हस्ते मी स्वीकार करीन.'' विद्यार्थी नसूनही मुकुंदा आणि एस्‌.व्ही. यांचे संबंध जुळले ते मात्र माध्यमिक शिक्षणोत्तर विद्यार्थी संघामुळेच, हे विसरता येणार नाही.

असे हे गुरुवर्य एस्‌.व्ही.कुलकर्णी. मूळचे इस्लामपूरचे. त्यांच शिक्षण झालं कोल्हापूर आणि पुण्यास. आम्हा ठाणेकरांच भाग्य थोर म्हणून नियतीने त्यांना ठाण्यात पाठवलं. १९३६ सालापासून ते ठाणेकर झाले. प्रथम मो. ह. विद्यालय आणि तेथून निवृत्त झाल्यावर श्रीरंग विद्यालय अशी १९७७ पर्यंत ४० वर्षे त्यांनी ठाण्यातील असंख्य विद्यार्थी घडवले. कुटुंबेच्या कुटुंबे आणि त्यातीलही दोन दोन पिढ्या त्यांच्या हाताखालून गेल्या. सरांचं आपल्या विद्यार्थ्यांवर इतकं प्रेम होतं की हाताखालून गेलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला ते पहिल्या नावानं ओळखत. माझी मोठी बहीण रती मथुरे आणि तिच्या मैत्रिणी म्हणजे सुमन टेंबे, सिंधू चाफेकर, सुशिला खारकर या ४७ साली मॅट्रिकला बसलेल्या मुली. परंतु अखेरपर्यंत सर भेटले की चौकशी करत, '' रती काय म्हणते?, सिंधू कशी आहे? सुमन भेटली नाही बरेच दिवसात...'' सरांसारखंच बाईंनीही आमच्यावर खूप प्रेम केलं. मंडळाच्या कामानिमित्त कधीही घरी गेलो तर खाऊ घातल्याशिवाय सोडत नसतं. माझे वडील, आम्ही सर्व भावंडं आणि माझा मुलगा सुमा अशा आमच्या तीन पिढ्या मो. ह. विद्यालयातून शिकल्या. सुमा इंग्लंडहून उच्चशिक्षित होऊन आला तेंव्हा मो. ह. विद्यालयात त्याचा सत्कार करण्यात आला. गुरुवर्य एस्‌.व्हीं. च्या जन्मशताब्दीप्रीत्यर्थ मो. ह. विद्यालयात

एक कार्यक्रम झाला. त्यानिमित्ताने वैयक्तिक आणि सामूहिक पातळीवरील अनेक आठवणी जागृत झाल्या. त्यांतील काही विशेष गोष्टी इथे मांडल्या. गुरुवर्य एस्. व्ही. कुलकर्णी यांच्या पवित्र स्मृतीस मी, माझे, कुटुंबीय आणि माध्यमिक शिक्षणोत्तर विद्यार्थी संघ यांचे वतीने अभिवादन करतो.

**श्री. हेमचन्द्र स. मथुरे**
अध्यक्ष,
माध्यमिक शिक्षणोत्तर विद्यार्थी संघ, ठाणे

●●●

## पुस्तके वाचा

तणावमुक्त व्हायचे असेल, तर पुस्तक वाचणे हा खूप चांगला उपाय आहे. सध्याच्या काळात आपले वाचन कमी होत चालले आहे किंवा इंटरनेटवरील साइटवर वाचन वाढले आहे. इंटरनेटवर मजकूर वाचण्याने आपल्या ज्ञानात भर पडत असली, तरी त्यात 'डिस्ट्रॅक्शन' खूप असते. त्यामुळे तणावमुक्तीसाठी वाचन करायचे असेल, तर पुस्तकांसारखा पर्याय नाही. पुस्तके वाचण्यात एक सलगता असते. शिवाय ती वाचताना लक्ष केंद्रित करावे लागते. त्यामुळे मानसिक एकाग्रता साधते. पुस्तके विशिष्ट प्रकारचीच हवीत असे नाही. अगदी कथा-कादंबऱ्याही ताणमुक्तीसाठी खूप उपयोगी पडतात. कारण त्यांतील पात्रयोजनेमुळे आपण आपल्या विवंचनातून थोडे बाहेर पडत असतो. शिवाय कथेमुळे उत्कंठा ताणली जाते आणि आपण त्यात गुंतले जातो. बौद्धिक विषयांवरील पुस्तके चांगलीच; पण थोडा वेळ हलक्याफुलक्या विषयावरील, विनोद पुस्तकेही वाचली पाहिजेत. झोपण्यापूर्वी पुस्तके वाचण्याची सवय चांगली.

**– संग्रहातून**

## पालकांसाठी

- *कुठल्याही परिस्थितीत मुलांसमोर वादविवाद टाळावेत. मुलांवर त्याचा विपरीत परिणाम होऊ शकतो.*
- *मुलांशी मोकळेपणानं बोला. त्यांचं म्हणणं ऐकून घ्या. त्यांच्या भावना समजून घेण्याचा प्रयत्न करा. जेव्हा ती अस्वस्थ असतील, समस्याग्रस्त असतील, तेव्हा त्यांना मायेनं जवळ घ्या.*
- *स्वतः मानसिक व शारीरिक दृष्टचा स्वस्थ राहण्यासाठी प्रयत्न करा. त्यानं मुलांसमोर आदर्श निर्माण होईल.*
- *भवताली घडणाऱ्या सामाजिक दुर्घटनांविषयी (बॉंबस्फोट, दहशतवाद इत्यादी) मुलांना सौम्य शब्दांत समजावून सांगा. त्याविषयी त्यांच्या मनात अवास्तव भीती किंवा राग निर्माण होणार नाही, हे पाहणं फार महत्वाचं आहे.*
- *अयोग्य वर्तनाबद्दल तज्ज्ञांच्या साह्यानं मुलांसाठी काही शिस्तीचे नियम, तसेच वागणुकीची पथ्यं ठरवून घ्या.*

**– संग्रहातून**

# जलसाक्षरता काळाजी गरज

*पालघर येथील दांडेकर महाविद्यालयाच्या व्यवस्थापन समितीचे कार्याध्यक्ष प्रा. अशोक ठाकूर यांच्या सहकार्याने त्यांच्या वार्षिकातील पुढील ३ लेख पुनर्मुद्रित करत आहोत. – संपादक*

एखादी गोष्ट विपुल प्रमाणात उपलब्ध असली की माणसाला तिची किंमत वाटत नाही. पाणी हा असाच एक विषय. या विषयाकडे पाहण्याचा आपला दृष्टीकोन जर आपण बदलला नाही तर आज ना उद्या आपल्याला पाण्याच्या तीव्र टंचाईला तोड द्यावे लागेल, हे स्पष्ट आहे.

पुढचे महायुद्ध झालेच तर ते पाण्यावरून होईल, असे या क्षेत्रातील विचारवंत नेहमी म्हणत असतात. हा धोक्याचा इशारा आपण अजूनही गांभीर्याने घेत नाही. हे कटू वास्तव आहे. कल्पना करा, एक दिवस आपल्याला पाणीच मिळाले नाही तर काय होईल? पाण्याशिवाय जगणे ही कल्पनाच सहन होत नाही. नळाला एक दिवस पाणी आलं नाही ती आपण अस्वस्थ होतो. तहानेने व्याकुळ झालेलं असताना पाणी मिळाले नाही तर त्यावेळी आपल्याला पाण्याचं महत्त्व कळतं. पण तरीही कळत नकळत पाण्याची नासाडी आणि त्याचं प्रदूषण आपण करत असतो. आपण मात्र या पाण्याच्या उपकाराची फेड अपकाराने करतो.

पाणी हे जीवन आहे. पाण्याशिवाय सृष्टीतील एकही जीव जगू शकत नाही. माणसाने विज्ञान-तंत्रज्ञानात मोठी झेप घेतली आहे. नवे शोध लावले जात आहेत. शेती, उद्योग, वाहतूक, दळणवळण अशा सर्व क्षेत्रांत त्याने प्रगती केली. वातावरण बदलले, राहण्याच्या, जगण्याच्या पद्धती बदलल्या आणि पर्यायाने पाण्याच्या स्वच्छतेकडे दुर्लक्ष झाले. आज केवळ नद्याच दूषित नाही तर पिण्याच्या पाण्याचे सारे प्रवाहच दूषित झाले आहेत. केवळ शहरातील पाणी नाही तर गावागावातील गटाराचं पाणी आज ओढ्यात, नद्यांत मिसळत आहे. उद्योगांतील रसायनमिश्रित पाणी सारं नादीच्या पात्रात सोडलं जातं. पाणी वाचविण्याच्या मोहिमा गेल्या काही वर्षांपासून सर्वत्र जोराने सुरू आहेत. तरीही पाणी या विषयाबद्दल अजूनही म्हणावी तितकी जागृती झालेली दिसत नाही. पाणी म्हणजे जीवन ही गोष्ट आपण शाळेत शिकतो. परीक्षेत या प्रश्नाचे चोख उत्तर देऊन उत्तम गुणही मिळवतो. पण प्रत्यक्षात याचे उत्तर शोधण्यात आपण खूपच कमी पडतो.

पावसाचे बरेचसे पाणी वाहून जाते. त्याचा काहीच उपयोग होत नाही. पावसाळ्यात पडणारे पाणी साठविले गेले तर गरजेच्यावेळी या पाण्याचा उपयोग होऊन आज उन्हाळ्यात जाणवणारी पाणी टंचाईची तीव्रता कमी होईल. लोकसंख्येतील अफाट वाढ, लोकांच्या राहणीमानाच्या बाबतीत वाढलेल्या अपेक्षा आणि विकासाची प्रक्रिया यांमुळे पाण्याच्या मागणीत सातत्याने वाढ होत आहे. लोकसंख्या वाढीवर नियंत्रण करणे हाही एक महत्त्वाचा पैलू ठरतो. पाण्याचे व्यवस्थापन हे आगामी काळात अधिक अवघड व खर्चिक होणार आहे.

वाढतं जागतिक तापमान हा आज सर्वांच्या चिंतेचा विषय बनला आहे. पाण्याची कमतरता हा येत्या काही वर्षांत जगाला भेडसावणारा प्रश्न ठरणार आहे. जगातील उपलब्ध पाण्याच्या साठ्यांपैकी केवळ एक टक्का पाणी मानवी जीवनास उपयुक्त आहे. लाखो भारतीयांसाठी आजही पिण्याचे पाणी हे मृगजळ ठरले आहे. झपाट्याने विकसित होणारी अर्थव्यवस्था आणि मोठे क्षेत्र यांच्यासाठी आवश्यक असलेल्या पाण्याचा वापर दिवसेंदिवस कमी

होत चालला आहे. वातावरणातील बदलामुळे भारतासारख्या देशांमध्ये ऋतुमानात असमतोल निर्माण होऊ लागला आहे.

पाण्याचा योग्य वापर, पाण्याचा पुनर्वापर पाण्याबाबतचे कायदे आणि पाणी वापरासाठी मूलभूत सुविधा यांचा मात्र अभाव आहे. नियोजनबद्ध आणि सुयोग्य पाणी व्यवस्थापन तसेच याबाबतचे दूरगामी कायदे हा यावरील तोडगा आहे. खरंतर नद्यांत पाणी सोडताना ते प्रक्रिया करून सोडावं. असा जलप्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण कायदा इ.स.१९७४ आहे. विविध जलप्रवाहांचे आरोग्य अबाधित राखणे हा या कायद्याचा मुख्य उद्देश आहे.

पाणी म्हणजे जीवन! म्हणूनच मानवी जीवनात स्वच्छ व शुद्ध पाण्याचे महत्त्व आहे. देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी सर्व समाज आरोग्य संपन्न हवा, त्यासाठी भरपूर व बारमाही शुद्ध पाण्याचा साठा उपलब्ध असायला हवा. आपल्याला स्वच्छ व निर्मळ दिसणारे पाणी शुद्ध व सुरक्षित असतेच असं नाही, अशा पाण्यामध्ये मानवास हानिकारक ठरू शकणारे असंख्य रोगजंतू असू शकतात. माणूस पाणी प्रदूषित करण्याचे खटाटोप जेवढ्या प्रमाणात करताना दिसतो त्याच्या तुलनेत पाणी शुद्ध ठेवण्यासाठी तो करीत असलेले प्रयत्न एक शतांशाहूनही कमी आहेत.

पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी पावसाच्या प्रत्येक थेंबात विकासाचे सामर्थ्य आहे. पाण्याचा वापर व पुनर्वापर केला पाहिजे परंतु आपल्याकडील लोकांमध्ये वापरलेले पाणी पुन्हा वापरण्याची मानसिकता रुजलेली नाही. पाण्याचा योग्यप्रकारे वापर केला नाही तर ते विषही ठरू शकते.

जलसाक्षरता ही आजच्या आधुनिक तंत्रज्ञान युगातील काळाची गरज आहे. पाण्याच्या उपलब्धतेसाठी पाऊस हा एकमेव नैसर्गिक स्त्रोत आहे. आपण जर पाण्याची काटकसर केली नाही ती परमेश्वर आपणाला कदापिही क्षमा करणार नाही, म्हणून पाण्याचा वापर काळजीपूर्वक व नियोजनबद्ध रितीने होणे ही काळाची गरज आहे. पैशाच्या बचतीसारखी पाण्याच्या बचतीची सवय लावून घेणे जरुरीचे आहे. नाहीतर पाणी टंचाईची समस्या सोडविणे अशक्य आहे.

पाणी हे ग्रामीण व शहरी विकासाचे एक महत्त्वाचे साधन आहे. आता गरज आहे ती वैयक्तिक आणि सामुदायिक स्तरावर आपण सर्वांनी मिळून प्रयत्न करण्याची प्रत्येकाने स्वतःच्या कृतीतून समाजापुढे आदर्श निर्माण करण्याची, प्रत्येकाने हे जलसाक्षतेचे धडे गिरवले पाहिजे. तरच जलजागरणाच्या कामास गती येईल.

तुकाराम महाराजांनी असे म्हटले आहे की,

बळबुद्धी वेचुनिया शक्ती ।<br>
उदक चालवावे युक्ती ।।

यांच्या या युक्तीतील मर्म लक्षात घेऊन आपण युक्तीने पाणी वापरायला शिकलो तर भावी पिढ्या आपल्याला धन्यवाद देतील, इतकेच नाही तर संपूर्ण मानव जातीचे भविष्य उज्ज्वल होईल, हे उघड आहे.

**अंकिता रविंद्र पाटील**<br>
दांडेकर महाविद्यालय, पालघर.

●●●



# भारतीय जनगणना-२०११ एक दृष्टीक्षेप

*भारतीय जनगणनेची ठळक वैशिष्ट्ये या लेखात विशद केलेली आहेत. - संपादक*

भारतीय जनगणना ही एक समृद्ध परंपरा आहे. २०११ च्या जनगणनेचे घोषवाक्य **'आपली जनगणना आपले भविष्य'** असून जनगणनेवर समृद्ध व प्रगत राष्ट्राचे भविष्य अवलंबून असते. जगातील सर्व जनगणनेमधील भारताची जनगणना ही सर्वश्रेष्ठ मानली जाते. कारण विविध भाषा, जाती, धर्म, संस्कृती असे अनेक वैशिष्टे असलेले भारत हे एक जगातील सर्वांत मोठे लोकशाही राष्ट्र आहे.

भारतासारख्या विकसनशील देशात जनगणनेला लोकांची गणना किंवा मोजणी करणे एवढाच संकुचित अर्थ नाही. जनगणनेद्वारे देशातील लोकांची संख्या जाणून घेण्याबरोबरच त्यांची सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक स्थिती जाणून घेतली जाते. जनगणनेला अतिशय जुनी परंपरा आहे. भारतामध्ये इ. स. १८७२ साली ब्रिटीश राजवटीत पहिली जनगणना करण्यात आली. तेव्हापासून आजपर्यंत दर दहा वर्षांनी नियमितपणे जनगणना केली जाते. कोणत्याही नैसर्गिक आपत्तीमुळे जनगणनेच्या काळात कधीही खंड पडू दिला जात नाही. इ. स. १८७२ ते इ.स. १९७१ दरम्यान झालेल्या जनगणना भारतात विविध राज्यांत करण्यात आल्या.

आज भारत जगात एक महासत्ता म्हणून उभारी घेत आहे. सर्वच अंगाने भारताची विकासाकडे घोडदौड चालू आहे. जगातील इतर महासत्ता भारताकडे भावी महासत्ता राष्ट्र म्हणून पाहत आहेत. इ.स.२०११ ची जनगणना १५ वी व भारताच्या स्वातंत्र्यानंतरची ७ वी जनगणना आहे. जनगणनेत भारतीय लोकांचा सहभाग, विविधतेत एकता हे या राष्ट्रीय भावनेचे प्रतीक आहे.

भारत एक लोकशाही समाजवादी व कल्याणकारी राज्य म्हणून ओळखले जाते. भारतीय जनतेच्या संपूर्ण प्रगती व कल्याणासाठी स्वतंत्र भारताने विविध पंचवार्षिक व वार्षिक योजना धोरणे व कार्यक्रम तयार केले. अगदी तळागाळातील माणसांच्या विकासासाठी आवश्यक धोरण तयार करण्यासाठी लागणारी सविस्तर माहिती ही जनगणनेद्वारे प्राप्त होते. या माहिती आधारेच देशाच्या सर्वांगीण विकासाचा आराखडा अचूकपणे तयार करता येतो.

जनगणनेद्वारे सुप्रशासन प्रदान करण्यास सहकार्य होते. साक्षरतेच्या प्रमाणात झालेली वाढ किंवा घट यांचे विश्लेषण करता येते. रोजगार व बेरोजगारीची माहिती उपलब्ध होते. उत्पन्न व खर्चासंबंधीची माहिती प्राप्त होण्यास मदतदायी ठरते. शिक्षणासंबंधीची आकडेवारी उपलब्ध होते. धर्म व भाषा संबंधी महत्त्वपूर्ण माहिती संकलन करण्यास मदत होते. घर व बेघराची माहिती मिळते. स्त्री-पुरुष प्रमाणाची आकडेवारी उपलब्ध होते.

<u>सन २०११ च्या जनगणनेतील ठळक वैशिष्टचे पुढीलप्रमाणे-</u>

२००१ ते २०११ या १० वर्षांच्या कालावधीत लोकसंख्येत १८.१ कोटींची भर पडून भारताची लोकसंख्या १२१ कोटींवर जाऊन पोहोचली आहे. परंतु थोडीशी समाधानकारक बाब म्हणजे लोकसंख्या वाढीचा दर २१.५४ टक्क्यांवरून १७.६४ टक्क्यांपर्यंत खाली आला आहे.

२००१ ते २०११ या दशकात लोकसंख्येत

झालेली वाढ म्हणजे ब्राझीलच्या जवळजवळ एकूण लोकसंख्येएवढी आहे. ब्राझील हे लोकसंख्येच्या बाबतीत जगातील पाचव्या क्रमांकाचे राष्ट्र आहे.

एकूण लोकसंख्येपैकी सर्वांत जास्त लोकसंख्या उत्तर प्रदेश राज्याची (१९.९५ कोटी) तर सर्वांत कमी लक्षद्वीप या केंद्रशासित प्रदेशाची (६४,४२९) आहे. उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्राची मिळवून जेवढी लोकसंख्या आहे त्यापेक्षा थोडी कमी लोकसंख्या अमेरिकेची आहे.

एकूण लोकसंख्येची घनता २०११ नुसार ३८२ चौ.कि.मी. वर पोहोचली आहे. लोकसंख्येची सर्वांत जास्त घनता दिल्लीत (३७,३४६ प्रति चौ.कि.मी.) आहे. सर्वांत कमी अरुणाचल प्रदेश फक्त १ प्रति चौ.कि.मी. आहे.

देशातील साक्षरता दर २०११ मध्ये ६४.८३% होता. त्यामध्ये ९.२१% ची वाढ होऊन आता ७४.०४% झाला आहे. एकूण साक्षरतेपैकी पुरुषांचे साक्षरतेचे प्रमाण ७५.२६ टक्क्यांवरून ८२.१४% वर गेले आहे. तर स्त्रियांच्या बाबतीत हे प्रमाण ५३.६७% वरून ६५.४६% झाले आहे. सर्वांत जास्त साक्षरता केरळमध्ये (९३.९१%) असून सर्वांत कमी बिहार राज्यात (६३.८५%) असल्याचे निदर्शनास आले आहे.

२००१ ते २०११ या कालावधीत भारतात दर हजारी पुरुषांच्या तुलनेत महिलांचे प्रमाण ९३३ वरून ९४० वर गेले आहे. दहा वर्षात दर हजारी सात महिलांची त्यात भर पडली आहे. लिंग गुणोत्तरातील घसरणीचे प्रमुख कारण गर्भजल चिकित्सा तंत्राचा वापर करून मुलीचा जन्म टाळण्याच्या वृत्ती वाढत असल्याचे दिसते.

या जनगणनेची आकडेवारी लक्षात घेता भारत लोकसंख्यावाढीबाबत दुसऱ्या क्रमांकावर आहे. नजीकच्या काळात जर लोकसंख्या याच गतीने वाढत राहिली तर लोकसंख्या वाढीमुळे निर्माण झालेल्या समस्या उदा. वाढते नागरीकरण, बेकारी, दारिद्र्य, भूकबळी, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, खून, दरोडे आणि पर्यावरणाचा ढासळता समतोल या समस्या अधिकच तीव्र बनतील आणि त्यामुळे भारताचे सर्व समावेशक विकासाचे उद्दिष्ट पूर्ण होण्यामध्ये मात्र अडथळे निर्माण होतील, असे चित्र दिसते.

आज भारतातील लोकसंख्या वाढीवरून दिसून येत आहे की, भारताच्या दारिद्र्याचे गरिबीचे कारण काय? लोकसंख्या, भारतातल्या बेकारीचे कारण काय? लोकसंख्या, भारताच्या वाढत्या परकीय कर्जाचे कारण काय? लोकसंख्या, तसेच भारताच्या महागाईचे कारण काय? लोकसंख्या. कमी उत्पादन व जास्त लोकसंख्या. ही वाढ नियंत्रणात ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. ही एक ज्वलंत समस्या आहे. लोकसंख्या कपातीसाठी शासन आणि जनता एकत्र येऊन एका कुटुंबात एक किंवा दोन अपत्य हा विचार कृतीत आला तरच भारताची लोकसंख्या काही प्रमाणात कमी होऊ शकते. तरच भारत काही काळात महासत्ता बनण्यास फार वेळ लागणार नाही. कारण देशातील लोकसंख्या किती आहे यापेक्षा तिची गुणवत्ता कशी आहे, यावर देशाचा विकास व मानवी विकास अवलंबून आहे, हे विचारात घेणे गरजेचे आहे.

तेव्हा जनगणनेकडे एक लोकसंख्या शास्त्राचा आधार म्हणून पाहिजे जाते जनगणना अहवालातून देशातील वास्तव स्थिती समजावून घेऊन भविष्याकालीन नियोजन कसे असावे, त्यांची अंमलबजावणी कशी झाली पाहिजे, यासाठी जनगणना अहवाल हा एक आधार विश्वसनीय माहितीचा म्हणून पाहिले जाते. म्हणून याला एक आगळेवेगळे महत्त्व आहे.

**वैभव राजेंद्र वांदरकर**
दांडेकर महाविद्यालय, पालघर

●●●

# क्रांती हवी

*तरुणांना आज क्रांती हवी, देशाचे भविष्य उज्ज्वल करण्यासाठी - संपादक*

भारताचा इतिहास पहिला तर क्रांती या दोन अक्षरांची ताकदच मोठी दिसते. क्रांती हा शब्द उच्चारताच त्या तरुणांच्या बाहा.

वासुदेव बळवंत फडके, सावरकर, आझाद, बाबू गेनू, भगतसिंग, राजगुरू, सुखदेव अशा अनेक क्रांतीवीरांची नावे आजही आम्ही घेतो तेव्हा छाती अभिमानाने फुलून येते. तत्कालीन भारतमातेला या विरांची खऱ्या अर्थाने गरज होती. म्हणूनच तर असे तरुण घडले. जुनं-नवं स्वतःच्या बुद्धीवर घासून परिवर्तनाचा मार्ग स्वीकारला. या साऱ्या क्रांतिवीरांचे स्मरण म्हणून आम्ही मोठ्या उत्साहात क्रांतीदिन साजरा करतो. पण आजही या देशाला अशाच बुद्धीनिष्ठ, बेधडक करारी आणि संस्कारी क्रांतिवीरांची गरज आहे, हे विसरतो. नाना पाटेकरांचा क्रांतीवीर पाहतो, साला एक मच्छर आदमी को हिजडा बना देता हैं। डायलॉग ऐकतो आणि दात विचकतो बस. यापलीकडे आमच्याने कुठलीही कृती होत नाही. ही शोकांतिका आहे.

भ्रष्टाचार, अज्ञान, अंधश्रद्धा, दारिद्र्य, दहशतवाद, बेकारी एक ना अनेक समस्या आमच्यासमोर आहेत.

कालपर्यंत इंग्रजांनी छळलं. आज आमचेच लोक आम्हांला पिळतात. स्वतःची पोटं भरतात. पण याविषायी कुणीही आवाज उठवत नाही. काहीतरी नवं घडावं, नवा बदल व्हावा, क्रांती घडावी, असं मनापासून वाटतं. पण शिवाजी जन्मावा दुसऱ्या घरात, अशी आमची वृत्ती बनली आहे. मग कशी घडणार क्रांती?

बेकारी नावाचा महाराक्षस आजच्या तरुण पिढीला भेडसावत आहे. असंख्य उपाय केले जातात, नाही अशातला भाग नाही पण आजार वेगळे आणि औषधे वेगळी अशीच या उपायांची स्थिती झाली आहे. एखादा पक्ष, संघटना उठते स्थानिकांना भरती करा, भूमिपूत्रांना प्राधान्य द्या, असं म्हणत भरतींवरच स्थगिती आणतात. आम्ही मूर्खासारखे पुन्हा पुन्हा खोट्या आश्वासनांना फसतो हाती काय? तर बोरी. आम्ही जिथे आहोत तिथेच कुणालाही यावर ठोस उपाय मिळत नाही कारण आमच्या बुद्धीवर गंज चढलाय. क्रांती (बदल) हवी असेल तर प्रथम बुद्धीवरील गंज साफ करावा लागेल.

बेकारी वाढली आहे. कारण परप्रांतीयांचे लोंढे आले, असे आम्ही सांगतो. पण ते इथे का आले? कारण इथे काम आहे, व्यवसाय आहे आणि ते करायला त्यांना लाज वाटत नाही आणि आम्ही? आम्ही नोकरीतच समाधानी. व्यवसाय, धंदा हा आमचा प्रांतच नाही. हा आमचा ठाम समज. का नाही वाढणार बेकारी? मळलेल्या पायवाटेवर कुणीही चालते की! कधीतरी मार्ग बदलून बघा. तेव्हाच बदल घडेल. क्रांती म्हणजे तरी वेगळं काय?

एक कसाब येतो. लाखो डोळ्यांदेखत शेकडो जीवन घेतो. आमच्या मनात दहशत पसरवतो आणि पहात असतो. रोगी मेल्यावर पोस्टमार्टेम करून मरणाचे निदान करतो. का असे घडते? आणि अशावेळी हे यौवन शांत का? उधाणलेल्या सागरात निधड्या छातीने उडी घेणाऱ्या सावरकरांना आठवा आणि मग आपलीच छाती अशी धपापलेली का हा प्रश्न विचारा. गळ्यात फास टाकतानाही

विस्मरण हे एक अलौकिक वरदानच आहे.

हास्य कायम ठेवणारा तरुण भगतसिंग पाहा आणि आज आपयश पचवता येत नाही म्हणून आत्महत्या कराणारा तरुण पाहा. सांगा ना अशाने घडेल क्रांती? हे सारं बदलायला हवं. डोकी उडवून नाही, डोकी बदलवून क्रांती करावी लागेल. यासाठी विचारांची आणि संस्कारांची गरज आहे.

रेव्ह पार्टीच्या नावाखाली धिंगाणा घालणे म्हणजे यौवन नाही. यौवन म्हणजचे जबाबदारीची जाणीव झालीच पाहिजे. भ्रष्टाचार होतोच कसा? आम्ही आम्हांला प्रश्न विचारून लढाईला सज्ज झालो पाहिजे. भ्रष्टाचार करून खाऊन-खाऊन फुगलेल्या फुग्यांनी टाचणी लावावीच लागेल आणि त्याची सुरुवात माझ्यापासून व्हावी. तरच बदल घडेल.

क्रांतीदिन साजरा झालाच पाहिजे. क्रांतीदिनी क्रांतीवीरांचं स्मरण झालेच पाहिजे पण त्याचबरोबर तत्कालीन परिस्थिती आणि त्या क्रांतीवीरांचे विचार यांची सांगड सद्य परिस्थिती आणि आमचे विचार यांच्याशी घातली पाहिजे. तरच बदल घडेल. क्रांती घडेल आणि क्रांतीदिन साजरा झाला, असे म्हणता येईल.

**धीरज पावडे**
दांडेकर महाविद्यालय, पालघर

●●●

**विद्याप्रसारक मंडळाचे माजी उपाध्यक्ष व जनकवी पी. सावळाराम यांची जन्मशताब्दी ४ जुलै रोजी सुरू होत आहे. त्यांच्या स्मृतीस अभिवादन!**

## मनाच्या पलीकडे

खरे ज्ञान ते असते, जे भेदातीत असते. स्वामी विवेकानंदांनी ही कल्पना अतिशय उत्तम रीतीने सांगितले आहे. ''जो काही भेद असतो तो अवकाश, वेळ व कार्यकारणभाव यामुळे जाणवत असतो. हे आपल्या मनाचे घटक आहेत. त्यांच्याशिवाय कोणतीही मानसिकता संभवू शकत नाही. 'वेळे' शिवाय तुम्ही कधीच विचार करू शकत नाही. तसेच अवकाशा शिवाय याचना असू शकत नाही व कार्यकारण भावनांशिवाय तुम्ही काही मिळवू शकत नाही.'' वेदान्तानुसार आपले मन (जाणिवा) जे मर्यादित आहे ते सत्य आहे.

म्हणून मनाच्या पलिकडे जाणे (त्याच्या मर्यादित जाणीवांसह) म्हणजे वेळ अवकाश व कार्यकारण भाव यांच्या पलीकडे जाऊन आत्म्याची अनुभूती घ्यायची. 'दृश्य जग' हे माणसाच्या मर्यादित जाणिवांचा परिणाम आहे. माणसाला जेंव्हा त्या पावित्र्याची (आत्म्याची) आपण ज्या स्वरूपात जाणतो, त्या निसर्गाची जाणीव होईल तेव्हा त्याचा शेवट होईल.

**संदर्भ :** Swami Vivikananda's Views on Supper Consciousness by Dr. R- Lakshmi **Prabuddha Bharat** Vol.118, No.1 Jan. 2013, Page - 127, 128

झालेल्या गोष्टी विसरून जाण्यातच आनंद आहे.

# परिसर वार्ता

**– संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

### डॉ. बेडेकर विद्या मंदिर शाळेचा निकाल ९९.६५%

शालांत परीक्षा मार्च २०१३ या परीक्षेचा निकाल नुकताच लागला आहे. या शाळेचा निकाल ९९.६५ लागला असून विद्यार्थ्यांच्या श्रेणीनुसार निकाल खालीलप्रमाणे आहेः

| टक्के | श्रेणी | विद्यार्थी |
|---|---|---|
| ९०% च्या वर | विशेष श्रेणी | २१ विद्यार्थी |
| ७५% ते ९०% पर्यंत | विशेष श्रेणी | ९० विद्यार्थी |
| ६०% ते ७५% पर्यंत | प्रथम श्रेणी | १०९ विद्यार्थी |
| ४६% ते ६०% पर्यंत | द्वितीय श्रेणी | ६० विद्यार्थी |
| ३५% ते ४५% पर्यंत | पास | ०३ विद्यार्थी |

गुणानुक्रमे १० विद्यार्थी व ९०% पेक्षा जास्त गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांची नावे खालीलप्रमाणे :

| क्रमांक | विद्यार्थ्यांची नावे | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | काळभोर प्रणिता हनुमंत | ९६.२०% |
| २ | पाटील अक्षया जयंत | ९५.४५% |
| ३ | भोईर दर्शना जयवंत | ९४.४०% |
| ४ | पिळणकर प्रणव प्रविण | ९४.००% |
| ५ | निकम अपूर्वा अरुण | ९४.००% |
| ६ | साकोरे प्रतिक शरद | ९३.८२% |
| ७ | सकपाळ प्रतिभा सतिश | ९३.६४% |
| ८ | शेलार मानसी चंद्रकांत | ९३.२७% |
| ९ | पाटील स्नेहल सखाराम | ९३.०९% |
| १० | साटम कविता नंदकिशोर | ९२.९१% |

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

### मुलांबरोबरचे काही क्षण (भाग–२)

या आधीच्या लेखातही असे काही अनुभव जे शिक्षकांच्या कायम स्मरणात राहतात ते मी आपणांस सांगितले हा त्याचाच पुढचा भाग...

- मुले जेव्हा ज्युनियर के. जी. मध्ये प्रवेश घेतात, तेव्हा त्यांना त्यांच्या आईचे व वडिलांचे नाव पूर्ण वाक्यात इंग्रजीत कसे सांगायचे याबद्दल मार्गदर्शन केले जाते. शिक्षिका वर्गातील प्रत्येकाला असे विचारत होती. एका मुलाला विचारल्यावर तो म्हणाला, 'टिचर माझ्याकडे फादर नाही आहेत.' शिक्षिकेला अगदी गहिवरून आले. तिने त्या लहानग्याला जवळ घेतले व जवळ बसायला सांगितले दोन–तीन मुलांची प्रश्नोत्तरे झाल्यावर हा मुलगा उठला आणि म्हणतो कसा, ''टिचर माझ्याकडे फादर नाही, पण पप्पा आहेत. त्यांचे नाव तुला चालले का?'' आपण मातृभाषा सोडून इतर भाषेतून शिक्षण देतो, एकाच शब्दाचे समान अर्थाचे अनेक शब्द असतात. या सगळ्यांचा मुलांवर ताण येतो की काय? त्यांचा गोंधळ उडतो की काय? हे प्रश्न मनात आल्याशिवाय राहात नाहीत.

- अभ्यासक्रमात मुलांना वस्तूंची एकास एक संगती लावून कुठल्या वस्तू संख्येने जास्त आहेत हे ओळखण्यास सांगितले जाते. एकदा अशाच पद्धतीने मुलांना प्रात्याक्षिक दिल्यानंतर एक एक मुलीची उजळणी चालू होती. कुठल्या वस्तू जास्त (more) असे शिक्षिकेने विचारले, ती मुलगी गोंधळली आणि म्हणाली, टिचर, मोर तर जंगलात राहतो इथे नाही. या उत्तरावर शिक्षिकेला काय आणि कशी प्रतिक्रिया देऊ असे झाले. पुन्हा एकदा मातृभाषा आणि अभ्यासक्रमाची भाषा वेगळी असण्याचा तोटा.

---

फळाच्या अपेक्षेत सुख दुःखाचे बंधन आहे.

• गणित विषयात विविध भौमितिक आकारांची (Shapes) मुलांना ओळख करून दिली जाते. एक नवीन आकार दाखवून त्याचे नाव सांगितले जाते. त्याच आकाराच्या इतर वस्तू ज्या आपल्या दैनंदिन जीवनात पाहायला मिळतात. त्या मुलांबरोबरच्या चर्चेतून त्यांना सांगितल्या जातात.

१) असचं गोल (Sphere) हा आकार मुलांना दाखवला. त्या आकाराच्या अनेक वस्तू दाखवल्या. मग आणखी कोणत्या वस्तू या आकाराच्या असतात. यावर चर्चा सुरू झाली. मुलांनी स्वयंपाकघरातील मोहरी, साबुदाणा या वस्तू याच आकाराच्या असतात हे सांगितल्यावर शिक्षिका थक्कच झाली. मुलींची निरीक्षण शक्ती अफाट असते. याचचं हे उदाहरण.

२) एक गमतीदार उदाहरण सांगते, मुलांना दंडगोल (Cylinder) हा आकार व त्याच्या विविध वस्तू दाखवल्या. मुलांनी इतर वस्तूंची नावे सांगितली. दुसऱ्या दिवशी प्रत्येकाने या आकाराची एक वस्तू शाळेत घेऊन यायची असे ठरले. दुसऱ्या दिवशी एक पालक भेटायला आले आहेत असा निरोप आला. पालकांशी बोलले, तर ते म्हणाले, 'टिचर, तुम्ही सिलेंडर शाळेत घेऊन या असे सांगितले का? पण ते शक्य नाही हो. नक्की हा काय प्रकार आहे?' मला काही क्षण कळेना, मग लक्षात आले की सिलेंडर नाही तर या आकाराची वस्तू घेऊन या असे सांगितले होते. तर या मुलाने गॅस सिलेंडर घेऊन शाळेत बोलावले आहे असे घरी सांगितले.

या वयातील मुले अतिशय निरागस असतात. यात शंका नाही. त्यांच्या मनात येणारे प्रश्न, शंका अगदी बिनधोकपणे विचारतात. आपली मतं, दृष्टिकोन बिनधास्त मांडतात. एकदा मुलांना खेळण्यासाठी मैदानात घेऊन गेले. जाताना दोरीच्या उड्या घेतल्या. मैदानात काही मोठ्या मुली (माध्यमिक विभागातील) दोरीच्या उड्यांचा सराव करत होत्या. ते मुलांनी बघितले. दोरीच्या उड्यांचा आपल्याला काय फायदा होतो हे मुलांना सांगितले. आता मुलांच्या हातात दोरी दिली. त्यांना करायला सांगितले. त्यावर एक मुलगा पुढे आला आणि म्हणाला, हे सगळं ठीक आहे ग टिचर पण तुला तरी मारता येतात का? मी या खेळात सराईत नाही हे त्या चिमुरड्याने कसे ओळखले काय माहीत? पण ते त्याने बिनधास्त विचारले सुद्धा!

खरचं असे अनेक अनुभव सर्व शिक्षकांजवळ नक्की असतील होय सर्व शिक्षकांची खरी पुंजी आठवणींची. जी अधिकाअधिक वाढतच जाते आणि आनंदाचे व्याज त्यावर चढवतच राहते. बरोबर ना!

**– सौ. प्रिती कुलकर्णी**
शिक्षिका, पूर्व प्राथमिक विभाग

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

### सौ. ए. के. जोशी इंग्रजी माध्यम शाळेचा दहावीचा निकाल १०० टक्के

विद्या प्रसारक मंडळाची सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम शाळेचा मार्च २०१३ च्या माध्यमिक शालांत परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला आहे. ओम बापट या विद्यार्थ्याने ९६.३६ टक्के गुण मिळवून शाळेतून प्रथम क्रमांक, ऐश्वर्या बापरडेकर हिने ९६.१८ टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक तर मंदार भालेराव याने ९५.८२ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला आहे.

या शाळेतून एकूण १५९ विद्यार्थी दहावीच्या परीक्षेस बसले होते ते सर्वच्या सर्व उत्तीर्ण झाले आहेत. यात विशेष प्रावीण्य–११८, प्रथम श्रेणी–३० आणि द्वितीय श्रेणी–११ विद्यार्थ्यांनी मिळविली आहे. तसेच ४४ विद्यार्थ्यांनी ९० टक्के आणि त्यापेक्षा अधिक गुण, ५१ विद्यार्थ्यांनी ८० ते ८९ टक्के, ३३ विद्यार्थ्यांनी ७० ते ७९ टक्के, १८ विद्यार्थ्यांनी ६० ते ६९ टक्के, १० विद्यार्थ्यांनी ५० ते

५९ टक्के आणि ३ विद्यार्थ्यांनी ४९ टक्के पेक्षा कमी गुण मिळविले आहेत.

**पहिले दहा क्रमांक – विशेष २५ क्रीडा गुणांव्यतिरिक्त**

| क्र. | विद्यार्थ्यांची नावे | टक्के |
|---|---|---|
| १ | बापट ओम | ९६.३६ |
| २ | बापरडेकर ऐश्वर्या | ९६.१८ |
| ३ | भालेराव मंदार | ९५.८२ |
| ४ | खिमसिया निल | ९५.६४ |
| ५ | पाठक वेदाली | ९५.०९ |
| ६ | मुतालिक आभा | ९४.५५ |
| ७ | सामंत इशा | ९४.३६ |
| ८ | नवरे सानिका<br>केळकर निलय<br>महाडिक विराज | ९४.१८ |
| ९ | करंदिकर ओंकार | ९४.०० |
| १० | पटेल मोहित | ९३.८२ |

**विषयातील सर्वप्रथम क्रमांक**

| विषय | विद्यार्थ्यांची नावे | गुण |
|---|---|---|
| **इंग्रजी** | १) सामंत इशा<br>२) दानोले परीता<br>३) धनावडे ऋतुजा<br>४) वाळंज ऋतुजा<br>५) मुतालिक आभा | ८७ |
| **मराठी** | १) मुसळे अनुजा | ९० |
| **संस्कृत** | १) आर्यमाने ऊर्वी<br>२) कामेरकर मनाली<br>३) खिमासिया निल<br>४) बापरडेकर ऐश्वर्या<br>५) पाठक वेदाली<br>६) करंदिकर ओंकार<br>७) बापट ओम<br>८) मुतालिक आभा<br>९) भालेराव मंदार | ९९ |
| **हिन्दी** | १) छेडा भुमित | ८९ |
| **गणित** | १) बापट ओम<br>२) मुतालिक आभा<br>३) छेडा भुमित<br>४) पत्रे जान्हवी | १४८ |
| **विज्ञान** | १) पटेल मोहित<br>२) बापट ओम<br>३) बापरडेकर ऐश्वर्या<br>४) भालेराव मंदार<br>५) महाडीक विराज | ९९ |
| **समाज शास्त्र** | १) बापट ओम<br>२) बापरडेकर ऐश्वर्या<br>३) भालेराव मंदार<br>४) खिमासिया निल<br>५) सामंत इशा | ९७ |

**फेब्रु.२०१३–टिळक विद्यापीठ गणित परीक्षेचा निकाल : १००%**

| इ. | परीक्षेला बसलेले विद्यार्थी | प्रावीण्यासह उत्तीर्ण | प्रथम श्रेणीसह उत्तीर्ण | द्वितीय श्रेणीसह उत्तीर्ण |
|---|---|---|---|---|
| इ.५वी | ६ | – | ५ | १ |
| इ.६वी | १२ | ५ | ७ | – |
| इ.७वी | ५ | २ | ३ | – |

**सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे**

| इ. | विद्यार्थ्यांची नावे | गुण |
|---|---|---|
| ५ वी | विश्वराज बोरकर | ७७ |
| ६ वी | अमेय दानोले | ९६ |
| ७ वी | प्रज्ञा घारपूरे | ९७ |

## बांदोडकर विज्ञान विद्यालय

**बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयास 'जागर जाणिवांचा' अभियानात द्वितीय क्रमांक**

२०१२-१३ या वर्षापासून 'स्त्री पुरुष समानता' या विषयावर आधारित 'जागर जाणिवांचा' अभियान राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागातर्फे संपूर्ण महाराष्ट्रात राबवले गेले.



या अभियानांतर्गत ठाणे जिल्ह्ययातून बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयास द्वितीय क्रमांकाचे बक्षीस मिळाले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृह, मंत्रालयासमोर, मुंबई येथे झालेल्या एका भव्य कार्यक्रमात ग्रामविकास मंत्री नामदार जयंत पाटील व खासदार सुप्रिया सुळे यांच्या हस्ते हे पारितोषिक बांदोडकर विज्ञान महाविद्यालयास प्रदान करण्यात आले. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व रोख रु. ५०,०००/– असे या पारितोषिकाचे स्वरूप आहे.



महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री नामदार अजितदादा पवार, सार्वजनिक बांधकाम मंत्री ना. छगन भुजबळ, कृषी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री नामदार राजेश टोपे, खासदार सुप्रिया सुळे, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु श्री. राजन वेळूरकर यांच्या उपस्थितीत बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील 'जागर जाणिवांचा' अभियानाचे समन्वयक प्रा. प्रकाश माळी, प्रा. अनिल आठवले, प्रा. बिपीन धुमाळे व सहभागी विद्यार्थ्यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर, उपप्राचार्य प्रा. विनायक बुरकुले, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. हरिभाऊ काटकर, पर्यवेक्षिका प्रा. पुष्पा कृष्णन तसेच डॉ. मुळगावकर मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली जागर जाणिवांचा या अभियानांतर्गत निबंध स्पर्धा, भितीपत्रके, काव्य लेखन व वाचन स्पर्धा, पथ नाट्या, प्रदर्शन असे विविध कार्यक्रमाचे यशस्वीपणे आयोजन प्रा. माळी, प्रा. आठवले, प्रा. धुमाळे यांनी केले. विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद या स्पर्धांसाठी मिळाला व हे यश प्राप्त झाले.

**बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या अकरावी, बारावी, तृतीय वर्ष विज्ञान शाखेत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांचा निकाल खालील प्रमाणे आहे.**

| इयत्ता | प्रथम वर्ग प्रथम श्रेणी | प्रथम श्रेणी प्राप्त विद्यार्थी | द्वितीय श्रेणी प्राप्त विद्यार्थी | तृतीय श्रेणी प्राप्त विद्यार्थी | टक्केवारी % |
|---|---|---|---|---|---|
| अकरावी | ९३ | २२१ | १३२ | ११ | ९७.८६ |
| बारावी | ६४ | १७२ | १८७ | १० | ९२.९१ |
| तृतीयवर्ष | – | ५७ | ८९ | ०० | ५७.४८ |

**प्रत्येक शाखेतील पहिले तीन विद्यार्थी**

| क्रमांक | अकरावी | बारावी | तृतीय वर्ष विज्ञान शाखा | एम. टी. – सी. ई. टी. |
|---|---|---|---|---|
| प्रथम | जेधे अजय अनंता (९०.२९%) | निफाडकर तेजस सुधीर (९१.५०%) | बेलेकर सूमित अनिल (९१.८८%) (संख्याशास्त्र) | केंदे वैदही विलास (PCB–१६३) |
| | | | | रे पल पार्थसारथी (PCM–१८५) |
| द्वितीय | दिघे तुषार अशोक (८९.४८%) | साहू अमरीत रामकृष्ण (९१.३३%) | परांजपे स्वारदा सुनिल (९०.३८%) (संख्याशास्त्र) | भागवत प्रणव उमेश (PCB–१४०) |
| | | | | निफाडकर तेजस सुधीर (PCM–१७९) |
| तृतीय | पेटारे अमित मिलिंद (८७.८६%) | नाबर प्रियाज नितिन (८९.८३%) | सिंग स्वरना रणविर (८८.६३) (संख्याशास्त्र) | झा निधिकुमारी रामकुमार (PCB–१३१) |
| | गोविलकर मुग्धा (८७.८६%) | | | साहू अमरीत रामकृष्ण (PCM–१७६) |

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

विद्यापीठाच्या वेळापत्रकानुसार ८ मे पर्यंत परीक्षा चालू होत्या. महाविद्यालय Cap चे सेंटर असल्या कारणाने सर्व प्राद्यापक २४ मे २०१३ पर्यंत व्यस्त होते.

महाविद्यालयाचे वार्षिक ''विधीज्ञ'' चे प्रकाशन दि. १५ मे २०१३ रोजी श्री. श्री. वि. करंदीकर (ज्येष्ठ सभासद विद्या प्रसारक मंडळ) यांच्या हस्ते करण्यात आले. श्री. करंदीकर ह्यांनी संपादकिय विभागाचे अभिनंद करताना विद्यार्थी तसेच शिक्षक वर्ग ह्यांना मासिकाचा उपयोग आपल्या लेखन शैलीत भर घालण्या करता करावा असे आव्हान केले. तसेच त्यांनी जमलेल्या उपस्थितांना दिशासाठी लेख लिहिण्यास प्रोत्साहित केले.

प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या, वरिष्ठ लिपिक श्रीमती रंजन करंदीकर तसेच कनिष्ठ लिपिक श्री. मुकेश राणे ह्यांनी सहसंचालक श्री. बाबासाहेब कदम ह्यांच्या तर्फे दि. २७ व २८ मे २०१३ रोजी भरविण्यात आलेल्या 'HTE सेवार्थ' ह्या कार्यशाळेत सहभाग घेतला. सदर कार्यशाळा भागूबाई चांगू ठाकूर महाविद्यालय पनवेल येथे भरविण्यात आली होती. सदर कार्यशाळेत इ-प्रणालीद्वारे पगार पावती भरणे, सेवार्थ प्रणालीमध्ये ज्यांचा पगार शासनातर्फे देण्यात येतो अशा प्रत्येक कर्मचाऱ्यांची माहिती भरणे. तसेच त्या संदर्भात आवश्यक माहिती DVD स्वरूपात देणे इत्यादी संदर्भात माहिती देण्यात आली. प्रत्येक महाविद्यालयाला HTE सेवार्थ प्रणालीचा वापर करण्यासाठी स्वतंत्र ID व पासवर्ड देण्यात आला.

दि. २६ मे राजी विद्यापीठाद्वारे LLB SEM-I चा निकाल जाहीर करण्यात आला. ही फेरपरीक्षा असून अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी घेण्यात येते. दि. २३ मे रोजी महाविद्यालयाच्या कार्यकारी मंडळाची सभा झाली. स्वर्गीय जिल्हा न्यायमूर्ती ठाणे, श्री. रास के. जाधव ह्यांच्या पत्नीने सरांची ९३ संदर्भ पुस्तके ग्रंथालयाला देणगी म्हणून दिली.

## विद्या प्रसारक मंडळाचे स्वप्न

*वेळणेश्वर पाहिलं,*
*ऐकली गाज समुद्राची.*
*परशुरामाने कोकण निर्माण केलं ...*
*त्याचाच आवाज तो*
*या सर्वांशी नातं जोडलं*
*आमच्या विद्या प्रसारक मंडळाने*
*टाकत दोन पावले पुढे*
*ओळखून गरज काळाची*
*परशुरामाच्या हातातील परशु घेत*
*घातला घाव कोकणच्या कातळावर*
*आणि सुरू झाली कहाणी*
*विराट स्वप्न प्रत्यक्षात येण्याची ...*
*अभियांत्रिकी गुरुकुलाची ओळखत गरज*
*वर्तमानाचे आरोग्य जपणाऱ्या*
*आमच्या डॉक्टरांनी*
*स्टेथस्कोप लावला कोकणच्या मातीला*
*तिची नाडी ओळखत*
*केली धडपड सुरू*
*डॉक्टरांची विजय मिळवणारी स्पंदने ऐकत*
*समुद्रही घाबरला.*
*आता आपला प्रतिस्पर्धी समोर आहे*
*असा विचार करत, क्षणभर थरारला ...*

**– मोहन पाठक**

●●●

# जाहीर आवाहन

**विद्या प्रसारक मंडळ, ठाणे :**

विद्या प्रसारक मंडळ १९३५ सालापासून गेली सुमारे ७५ वर्षे ठाण्यात शैक्षणिक प्रसाराचे कार्य करीत आहे. आधुनिक पद्धतीचे व जागतिक दर्जाचे अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याचा मंडळाचा मानस आहे.

**कोकण परिसराची निवड :**

एका बाजूला समुद्रकिनारा व दुसऱ्या बाजूला सह्याद्रीच्या रांगा यांच्या मधील या पट्ट्यातील जनता गेली सुमारे ४०० वर्षे उत्पादन क्षमता नसल्यामुळे जगण्यासाठी झगडत असते. पर्यटन व्यवसाय हाच काय तो व्यवसाय त्यांना थोडीफार साथ देत असतो.

कोकणातल्या रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांची एकूण लोकसंख्या जवळ जवळ ३० लाख आहे. तरी सुद्धा उच्च शिक्षणामध्ये दोन्ही जिल्हे मागास म्हणून गणले जातात आणि त्याचे कारण म्हणजे, उच्च शिक्षणाकडे कमी वळतात हे आहे. २००७ साली दिल्लीच्या विद्यापीठ अनुदान आयोगाने स्थापन केलेल्या एका समितीने संपूर्ण देशभर याविषयावर सर्वेक्षण करून आपला अहवाल सादर केला होता. त्या अहवालात संपूर्ण देशात ज्या भागामध्ये पुढे येण्याची प्रवृत्ती दिसत नाही, अशा भागांत आधुनिक धर्तीवर महाविद्यालये मोठ्या संख्येने निर्माण केली पाहिजे असे मत मांडले होते. भारताची उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांची सरासरी फक्त १२.४ आहे. त्या समितीला असेही आढळून आले की ५९३ जिल्ह्यांपैकी ३७४ जिल्हे असे आहेत की त्याठिकाणी उच्च शिक्षणासाठी काहीच सोयी नाहीत. महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांच्या टक्केवारीचे प्रमाण १७.३३ टक्के असून रत्नागिरी जिल्ह्याची उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी सर्वांत कमी आहे.

उच्चशिक्षण देणाऱ्या ७० टक्के संस्था एक तर मोठ्या शहरांत किंवा नागरी भागांत आहेत. याचे मुख्य कारण तेथील विद्यार्थ्यांना खर्चिक उच्च शिक्षण घेणे परवडते व शिक्षणासाठी आवश्यक शिक्षकवर्गही उपलब्ध होतो. यामुळे ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मोठ्या शहरातील महाविद्यालयांमध्ये जावे लागते. यावर उपाय एकच, की अशा प्रकारच्या संस्था आणि उच्च दर्जाचे शिक्षण देणारी महाविद्यालये ही ग्रामीण भागात काढली जावीत. यासाठी आवश्यक त्या मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करणे व त्यासाठी लागणारा खर्च करणे यांची पूर्तता करावी लागते. त्यामुळे गरजू व हुशार ग्रामीण विद्यार्थ्यांची सोय तर होईल; पण त्या ग्रामीण भागाचा मोठ्या प्रमाणावर विकास घडून येईल. तिथल्या लोकांचा फायदा व गरजूंना कामधंदे उपलब्ध होतील आणि त्या ग्रामीण भागाचे महत्त्वही वाढेल.

**विद्या प्रसारक मंडळाच्या नवीन प्रकल्पविषयी:**

**कोकणातील गुहागर जवळ असलेला वेळणेश्वर हा ग्रामीण भाग मंडळाने नियोजित शैक्षणिक प्रकल्पासाठी निवडला आहे.** त्या गावची लोकसंख्या जवळपास ३५०० आहे व अशा गावात सुमारे ६५ एकर वरकस जमीन मंडळाने खरेदी केली आहे. तेथे एक शंकराचे सुरेख मंदिर आहे. त्याला वेळणेश्वर असे नाव आहे. शिवाय अरबी समुद्राची किनारपट्टी ही या गावाला लागून आहे. सरकारच्या नियोजित आराखड्याप्रमाणे लवकरच तयार होणार सागरी किनारपट्टी महामार्गही वेळणेश्वर गावाच्या बाजूने जाणार आहे.

या वास्तू समूहामध्ये ६ शैक्षणिक विभागांसाठी स्वतंत्र इमारती, प्राचार्य व प्रबंधकासाठी बंगले, विषय प्रमुख व प्राध्यापक व प्रमुख कर्मचारी यांच्यासाठी स्वतंत्र वास्तू

दुःखाचे मूळ पैशात नसून पैशाच्या मोहात आहे.

आणि विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे व इतर संबंधित वास्तू असे सर्व मिळून दहा लाख चौरस फुटांचे बांधकाम असलेला प्रकल्पाचा पूर्ण **खर्च १५० कोटी रुपये पर्यंत अपेक्षित आहे.** त्यामध्ये ३००० विद्यार्थी निरनिराळ्या विभागांतून शिक्षण घेतील. शिक्षकी पेशातील, कार्यालयीन कर्मचारी, शास्त्रीय व इतर विषयांचे तंत्र आणि सादिलवार कामे करणारे असे सर्व मिळून १००० व्यक्ती असतील. शिवाय वरील अनुषंगाने इतर कामे करण्यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष इतरही व्यक्तींची वर्दळ वाढेल. याशिवाय, प्रकल्प सुरू झाल्यानंतर प्रकल्पा बाहेरच्या व्यक्तींनासुद्धा वाव मिळेल.

प्रकल्पाचा कल्पकतापूर्ण आराखडा जो ३००० विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी तयार केला आहे. त्याला चिपळूणच्या सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांनी मंजुरी दिली असून, त्याचा पहिला टप्पा २०१२ पर्यंत पूर्ण होणार आहे. सुरुवातीला ३०० विद्यार्थ्यांना प्रवेश अपेक्षित असून अभियांत्रिकीचा एकूण ४ वर्षाचा पदवी अभ्यासक्रम असेल. २०१२-१३ शैक्षणिक वर्षापासून अभियांत्रिकी महाविद्यालय चालू करण्यात येणार आहे. त्यानंतर नव्याने अभियांत्रिकी, व्यवस्थापन, वास्तुशास्त्र आणि हॉटेल व्यवस्थापन याप्रमाणे नवीन अभ्यासक्रम सुरू होतील.

**देणगीसाठी व मुदत ठेवीसाठी आवाहनः**

मंडळाला दानशूर, समाजसेवक, उदारमताच्या व्यक्ती, यांच्याकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीशिवाय दुसरा कोणताही उत्पन्नाचा मार्ग नाही. तुटपुंज्या फीच्या उत्पन्नामध्ये अशी नवीन महाविद्यालये निर्माण करणे शक्य नाही आणि म्हणून या सर्व बांधकामासाठी लागणारा आर्थिक पुरवठा बँकांकडून कर्ज घेऊन व जनतेकडून देणारी स्वरूपात मदत घेऊन करण्यात येतो.

नियोजित अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या बांधकामासाठी बँकेकडून मिळणाऱ्या कर्जाव्यतिरिक्त लागणारा निधी उपलब्ध करण्यासाठी रु. १० कोटींपर्यंत खालील अटींवर वैयक्तिक ठेवी स्वीकारण्यास धर्मादाय आयुक्त, मुंबई यांनी मान्यता दिली आहे.

१) संस्थेकडे ठेवण्यात येणाऱ्या ठेवी या कमीतकमी रु. ५०००/- त्याच्या पटीत स्वीकारण्यात येतील.

२) सदर ठेवीचा कालावधी ५/७ व १० वर्षाचा असेल. किमान ३ वर्षांपर्यंत ठेव परत केली जाणार नाही.

३) ठेवीसाठी वारसदार नेमणे आवश्यक असेल.

४) ठेवीच्या कालावधीत ठेवीदाराचा मृत्यू ओढवल्यास त्याच्या वारसास पंधरा दिवसात ठेव परत करण्यात येईल.

५) सदर ठेवीवर दरसाल दर शेकडा ५ टक्के सरळ व्याज दराने प्रत्येक वर्षाच्या मार्च महिन्याच्या अखेरीस व्याज देण्यात येईल.

६) काही अपरिहार्य कारणामुळे मुदतीपूर्वी ठेव मोडावयाची असल्यास, ठेवीदाराने ३ महिन्याची आगाऊ सूचना देणे आवश्यक असेल व ती मुदत ठेव ठेवल्यापासून सहा महिन्याच्या आत मोडल्यास त्यावर व्याज अनुदेय राहणार नाही.

या प्रकल्पावरती पुढील १० वर्षात सुमारे १५० कोटी रुपये खर्च होईल. हा प्रकल्प पूर्णत्वास जाणे हे त्यावेळेसच शक्य होईल, जेव्हा सर्व स्तरांतील दानशूर व्यक्ती व संस्थांचा हातभार लागेल. **या आवाहनातर्फे आम्ही आपणांस विनंती करतो की आपण अशा शैक्षणिक कार्यास सढळ हस्ते देणगी किंवा मुदत ठेवीच्या स्वरूपात मदत करावी व मंडळाच्या या राष्ट्रीय स्वप्नपूर्तीस हातभार लावावा.**

आपला विश्वासू,
**डॉ. विजय बेडेकर**
कार्याध्यक्ष
विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

●●●



# गीतासंदेश

- कशाला व्यर्थ चिंता करीत आहेस? कुणाला घाबरतो आहे? तुला कुणीही मारु शकत नाही. आत्मा अमर आहे.
- जे झाले आहे, जे होत आहे आणि जे होणार आहे ते सारे ईश्वरेच्छेने होत असल्याने ठीक आहे. गतकाळाचा पश्चाताप नको, भविष्याची चिंता नको. वर्तमानातच जग!
- तुझे काय गमावले म्हणून तू शोक करीत आहेस? तू काय घेऊन आला होतास? तू स्वतःचे असे काय निर्माण केलेस? जे मिळविलेस ते परमेश्वराकडूनच मिळविलेस. जे गमावलेस ते या भगवद्‌भूमीमधीलच होते. तू रिकाम्या हाताने आला आहेस व रिक्तहस्ते जात आहेस! तुझे असे काही नव्हते आणि असणारही नाही. तेव्हा या नश्वर गोष्टींना माझे समजून वृथा शोक करु नकोस!
- माया परिवर्तनशील आहे. संसार क्षणभंगुर आहे. एका क्षणात दरिद्री कोट्याधीश होतो. करोडपती भिक्षाधीश होतो. मृत्युही जीवन आहे. जीवनात मृत्यु आहे. लहान थोर, आप-पर सारे भेद मनातून नष्ट कर. सारे तुझे आहे. तू सर्वांचा आहेस!
- तू शरीर नाहीस, शरीर तुझे नाही. तू शरीराचा नाहीस. शरीर हा पंचभूतांचा मिलाफ आहे. त्यातील आत्मा आच शाश्वात आहे!
- स्वतःचे सर्वस्वसमर्पण भगवंताचे ठायी तू कर. तोच एक आश्रयस्थान, शरण्यधाम आहे. त्याला जाणून तू भय, शंका, शोक दुःखातून मुक्त हो. प्रत्येक कर्माची 'हरि ॐ तत् सत् ब्रह्मार्पणमस्तु' या भावनेने भगवंताचे चरणी आहुती दे. हा कर्मयोगाचा महान यज्ञ आहे यातच जीवन मुक्तीचे सार आहे. गोविंद परमानंद, शामसुंदर, नंदकुमार! तू एक महासागर आहे. मी एक बिंदू आहे. तू मला आपल्या अंतरात समावून घे.

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- *अत्याधुनिक दृक्‌श्राव्य यंत्रणा*
- *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
- *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## ❖ संपर्क ❖

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.